# तुटलेले दुवे

१९३८

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. ६११.

REFBK-0005783

माधव-जूलियन्

छापत आहे

# भाषाशुद्धि-विवेक

प्रा. माधवराव पटवर्धन एम्. ए.

# तुटलेले दुवे

म्हणजेच

## सुनीताञ्जली

## माधव-ज्यूलियन् कृत काव्यें

१ सुधारक
२ विरहतरङ्ग
३ द्राक्षकन्या
४ गज्जलाञ्जलि
५ स्वप्नरञ्जन
६ तुटलेले दुवे

## पुढील काव्यें

१ नकुलालङ्कार
२ मधुलहरी

## प्रा. माधवराव पटवर्धनकृत पुस्तकें

१ फार्सी मराठी कोश
२ उमर खय्यामकृत रुबाया
३ छन्दोरचना

रविकिरणमण्डळाचें २७ वें पुस्तक

# तुटलेले दुवे

म्हणजेच

## सुनीताञ्जलि

### माधव-जूलियन्



REFBK-0005783
REFBK-0005783

ता. २१ जानेवारी १९३८

मूल्य १ रुपया

पु. क्र.

## रविकिरणमण्डळ

गजानन त्र्यम्बक माडखोलकर
यशवन्त दिनकर पेण्ढरकर (यशवन्त)
शङ्कर केशव कानेटकर (गिरीश)
विठ्ठल दत्तात्रेय घाटे
माधव त्र्यम्बक पटवर्धन (माधव-जूलियन्)
दत्तात्रेय लक्ष्मण गोखले
श्रीधर बाळकृष्ण रानडे
[कै. सौ. मनोरमाबाअी रानडे]

[सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन]

मुद्रक नि प्रकाशक
लक्ष्मण नारायण चापेकर,
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव पेठ,
टिळक रस्ता, पुणें २.

श्री. सौ. लीला पटवर्धन

गृहीतागमा

हीस सप्रेम समर्पण

# प्रस्तावना

या पुस्तकांत मीं गेल्या सव्वीस वर्षांत वेळोवेळीं लिहिलेल्या सुनीतांपैकी बहुतेक सुनीतें सङ्ग्रहित करण्यांत आलीं आहेत. अेका कवीची— शारदा-किङ्कराची— ही दैनन्दिनी आहे. या दैनन्दिनीचीं कित्येक पृष्ठें अुपलब्ध नाहीत म्हणूनच या पुस्तकाला 'तुटलेले दुवे' असें नांव दिलें आहे. वेळोवेळीं लिहिलेलीं हीं स्फुट सुनीतें या नांवारूपास येतील अशी मला आरम्भीं अर्थातच कल्पनाहि नव्हती. कलाकृति ही जसजशी निर्माण होअून रूप धरूं लागते तसतशी तिच्या निर्मात्याला तिची कल्पना येत जाते. सुनीतरचनेचे निरनिराळ्या रीतींनी करून पाहिलेले प्रयोग म्हणून हीं सुनीतें स्वतन्त्रपणें अभ्यासून पारखतां येतील; पण एकाच शृङ्खलेंतील दुवे या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिल्यास काही अधिक रहस्य गावेल आणि व्यक्ति नि प्रसङ्ग यांच्या विविधतेंतहि अेक प्रकारचा कौटुम्बिक सम्बन्ध दृग्गोचर होअील.

'किङ्कर' हा अेक वापवेगळा पोरका कवि असतो. त्याचें त्याच्या एका ओळखीच्या श्रमन्त कथालेखकाच्या 'शारदा' नांवाच्या वहिणीवर प्रेम जडतें; आणि स्त्रीहृदयाच्या मनोरमपणाच्या जाणीवेसरशी दैनन्दिनीचा आरम्भ होतो. काही काळानें किङ्कराची प्रेमळ आओी ही कैलासवासी होते. त्याची वहीण 'शैला' ही एका साजांतून अुठलेल्या, सार्वत्रिक कुतूहलाचा विषय होऊन बसलेल्या तरुणावर प्रेम करूं लागते. पण पुढें लौकरच आनुवंशिक क्षयाने झिजून मरून जाते. जगांत अगोच अेकटा पडलेला हा भावनाप्रधान किङ्कर मित्रप्रेमांतहि निराशच

होतो. 'श्रीकान्त वाचस्पति' नामक अेका सुन्दर, बुद्धिमान् पण अनुदार अशा तरुणावर त्याचें प्रेम असतें; पण श्रीकान्ताकडून त्याला काही तशा मैत्रीची परत-भेट मिळत नाही. शारदेवरील प्रेमाची जाणीव झाल्यानन्तर सहजच पूर्वीच्या ओळखींतील मोकळेपणा जातो, सङ्कोचामुळे, दोघांतील अन्तराच्या तीव्र जाणीवेमुळे प्रेम व्यक्त करितां येत नाही. तें तो काव्यद्वारा ध्वनित करितो. प्रेमाचें दान तिला अभिमानास्पद वाटलें तरी पाणिग्रहणाचें भविष्य अिष्ट वाटतेंच असें नाही. मत्सर, राग वा औदासीन्य यानें दोघें काही काळपर्यन्त दुरावतात. पुढे कही कारण-परत्वें लिहिलेल्या व्यावहारिक पत्रानें तीं जवळ येतात, पुन्हा बोलूं चालूं लागतात; पण प्रेमाची प्रगति होत नाही. प्रकृति ही प्रेमाच्या प्रगतीची थोडीच वट पाहते? प्रकृतीच्या प्रभावानें दोघांनाहि व्यावहारिक शहाणपणाचा क्षणभर विसर पडतो. एकाला पुढे कसें जावें याचा ध्यास लागतो तर दुसऱ्याला माघार कशी घेतां येईल याची विवञ्चना लागते. या चमत्कारिक परिस्थितींतून वाट काढण्यासाठी शारदा ही पुढील शिक्षण घेण्यासाठी म्हणून विलायतेला जाते. तेथे तिची आणि श्रीकान्त वाचस्पतीची ओळख होते; आणि हिंदुस्थानांत येतांच त्यांचा अभिनन्दनीय मिश्र-विवाह होऊन तीं दोघें श्रीकान्ताच्या वड्या नोकरीच्या शहरीं रहायला जातात! काळ हा चढत्याचाच असल्यानें आशेच्या टकमक टोकावरून खाली कोसळलेल्या किङ्कराचा थोडाबहुत दुर्लौकिकच होतो. याला शारदेनेहि सहजगत्या हातभार लावला असेल. पण या धक्क्यानें तो मरत नाही. वैयक्तिक जीवन सुकून गेल्यामुळेच कीं काय तो आता सार्वजनिक जीवनांत भाग घेऊं लागतो. काही काळ्यानें

देण्यापलीकडे आणि काही प्रश्नांवर वैयक्तिक मतें देण्यापलीकडे तो काय सार्वजनिक कार्य करणार? पूर्वीच्या स्मृती त्याला कधीच होत नाहीत असें नाही. त्यांतच त्याला भावी मृत्यूची चाहूल लागते; आणि तो अशान्त होतो. जन्मभूमीच्या भेटींत मात्र काही घटिका त्याला अवर्णनीय शान्ति मिळते. तिकडे श्रीकान्त आणि शारदा यांच्या संसारांतहि सुखशान्ति दिसत नाही; आणि किङ्कराच्या सार्वजनिक हालचालींकडे तिचें अधिकच लक्ष जाऊं लागतें. शेवटीं ती जेव्हा किङ्कराच्या समाचाराला येते तेव्हा तो रुग्णालयांत घटिका-दोन-घटिकांचाच सवंगडी असतो. प्रेमसञ्जीवनीविषयीची त्याची काव्यकल्पना पूर्वीच रसातळाला गेलेली असते, तरी प्रेयसीच्या समोर हें असें नीरस सत्य नको, ती सरस मायाच हवी अशी फोल वासना व्यक्त करितां करितांच ही शारदा किङ्कराची दैनन्दिनी सम्पते. प्रेम आणि जीवन यांचा हा असा शोकान्त खेळ आहे. सृष्टीची योजना असते अेक आणि मानवांच्या अपेक्षा असतात भलत्याच !

सुनीतरचनेची अेक लाटच पन्धरा वर्षांपूर्वी उसळली होती. आता ती अगदीच ओसरून गेल्यासारखी दिसते. अेकन्दर गेल्या ३५ वर्षांत जी सुनीतरचना झाली ती पाहतां सुनीत या नांवाव्यतिरिक्त वस्तुतः काही स्पृहणीय पृथक् काव्यप्रकार मराठी कवितेच्या प्रान्तांत रूढ झाला आहे की नाही हें पाहणें अगत्याचें आहे, पण तें काम कवीचें नव्हे.

ता. १ जानेवारी १९३८.
"निवान्त", प्रभात रस्ता, पुणें ४.

माधव-जूलियन्

मराठी ग्रंथ संग्रहालय
५५८३
मराठी ग्रंथ संग्रहालय
३।०५।७.११.८५
३११२७५


# तुटलेले दुवे

देवा, स्त्रीहृदयीं मनोरमपणा केव्हा कुणीं ओतिला !
गङ्गौघापरि भूवरी वरुनि ये ओढाळ ओढा कसा !
भूमीतें पहिल्या रसें सजवितां हा सार्थ होओ रसा;
हा दिव्याभिमुखी करी अुजळुनी चेतोभवज्योतिला.
नेत्रें तीं वळतां अुठे प्रथम त्या वृष्टींतलें वादळ,
गालींचीं अरुण स्मितें झळकतां प्रीति त्वरें अङ्कुरे,
अेकाकी फुलतांच वाक्सुमन तें वेडा पतङ्ग स्फुरे,
त्या आलिङ्गनचुम्बनांत पहिली अेकी पटे मङ्गल.
कैशी घेत अनेक रम्य वळणें जाअी वरी हा पथ,
भासे मन्दिर न्हाणिलें गिरिशिरीं की सोनियाच्या रसें !
प्रीतीची अधिदेवताच वसशी तू त्या स्थळीं राजसे,
देवी, अन्तर तोडुनी तव पदीं आलोंच मी धावत.
म्हातारीं म्हणुं देत की भवपथीं काटेकुटे मातले—
काट्यांची क्षिति कां गुलाब फुलतां हे ध्येयलोकांतले !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५५८३..
दू. क्र.

[ २ ]

तू दारांत विचारिलें थबकुनी; "आलांत केव्हा तुम्ही ?"
अन् लाडीक तुझ्या खट्याळ वदनीं हास्यच्छटा रङ्गली.
"जा गे, साङ्ग चहा घरांत ! बघशी कां नेत्र विस्फारुनी ?"
झिप्रे ध्यान बघा, म्हणेल कुणिही 'भिल्लीण ही जङ्गली.'
जातां तू मज तो म्हणे, "घिटुकली साधी किती पोरटी !
लाडाने म्हणतों घरांत बिजली शारूस या"—आंतुनी
ताटें घेअुनि धाप टाकित पुढे आलीस तू गोरटी,
देतां ताट करीं तुझा पदर तो जाअी मला चाटुनी.—
"भारी घान्द्रट ! ये अशी बस अिथे घे दिल्रुबा तेथला,
काही दाव कला, स्तुती करिल हा, ठावें न या फारसें"—
"मी जाणार फिरावयास, मजला काही न येते कला;
तू मित्रास तुझ्याच दाखव कथा—त्या काढ, आता कसें !"
तेव्हाची 'बिजली' किती मज रुचे 'भिल्लीण' ती ! छे अता
या भोळ्यास खुळा करूनि, बनली दुधर्ष ती देवता !

[ २ ]

होतों वाचनमग्न आणि टिचकी दारावरी वाजली,
"आहे कोण तिथे!" म्हणूनि पुशिलें, येअीचना अुत्तर.
"या या आंत खुशाल, दार अुघडा, नाही कडी आंतुनी"—
कोणी तें अुघडी न, आणि टिचकी दारीं पुन्हा वाजली.
गेलों त्रासुनि आणि ताड अुठलों खुर्चीवरूनी तसा,
केलें दार खुलें, कुणीच न दिसे बाहेर, बाजूस तों—
कष्टाने निज हास्य आवरित तू चोराप्रमाणे अुभी!
हास्यस्फोटच होय, बान्ध फुटुनी डोळ्यांत पाणी भरे.
तू मागे लपवूनि हात पुशिलें, "झाली कशी जम्मत!
साङ्गा हो गणितज्ञ, काय लपलें हातांमधे आमुच्या.
साङ्गा रङ्ग, कराच मान्य अथवा झाली फजीती असें.
नापासासहि येथ बक्षिस मिळे, घ्या गुल्छबूचीं फुलें."
तो पेटीमधि मख्मली अजुनिही निर्माल्य आहे बरें.
हीं आहेत फुलें तुझींच तुजला वाटेल का हें खरें?

[ २ ]

तू दारांत विचारिलें थबकुनी; "आलांत केव्हा तुम्ही ?"
अन् लाडीक तुझ्या खट्याळ वदनीं हास्यच्छटा रङ्गली.
"जा गे, साङ्ग चहा घरांत ! बघशी कां नेत्र विस्फारुनी ?"
झिप्रे ध्यान बघा, म्हणेल कुणिही 'भिल्लीण ही जङ्गली.'
जातां तू मज तो म्हणे, "घिट्टकली साधी किती पोरटी !
लाडाने म्हणतों घरांत बिजली शारूस या"—आंतुनी
ताटें घेअुनि धाप टाकित पुढे आलीस तू गोरटी,
देतां ताट करीं तुझा पदर तो जाअी मला चाटुनी.—
"भारी धान्द्रट ! ये अशी बस अिथे घे दिल्रुबा तेथला,
काही दाव कला, स्तुती करिल हा, ठावें न या फारसें"—
"मी जाणार फिरावयास, मजला काही न येते कला;
तू मित्रास तुझ्याच दाखव कथा—त्या काढ, आता कसें ?"
तेव्हाची 'बिजली' किती मज रुचे 'भिल्लीण' ती ! छे अता
या भोळ्यास खुळा करूनि, बनली दुधर्ष ती देवता !

[ ३ ]

होतों वाचनमग्न आणि टिचकी दारावरी वाजली,
“आहे कोण तिथे?” म्हणूनि पुशिलें, येअीचना अुत्तर.
“या या आंत खुशाल, दार अुघडा, नाही कडी आंतुनी”—
कोणी तें अुघडी न, आणि टिचकी दारीं पुन्हा वाजली.
गेलों त्रासुनि आणि ताड अुठलों खुर्चीवरूनी तसा,
केलें दार खुलें, कुणीच न दिसे बाहेर, बाजूस तों—
कष्टाने निज हास्य आवरित तू चोराप्रमाणे अुभी!
हास्यस्फोटच होय, बान्ध फुटुनी डोळ्यांत पाणी भरे.
तू मागे लपवूनि हात पुशिलें, “झाली कशी जम्मत!
साङ्गा हो गणितज्ञ, काय लपलें हातांमधे आमुच्या.
साङ्गा रङ्ग, कराच मान्य अथवा झाली फजीती असें.
नापासासहि येथ बक्षिस मिळे, घ्या गुल्छबूचीं फुलें.”
  तो पेटीमधि मखमली अजुनिही निर्माल्य आहे बरें.
  हीं आहेत फुलें तुझींच तुजला वाटेल का हें खरें?

[ ४ ]

"रे श्रीकान्त पहा पहा ! तुळशिला घाली शुभाङ्गी जळ,
प्रार्थी जोडुनि हात, नेत्र मिटुनी राहे अुभी निश्चळ,
मार्थे नम्र पहा नि ओठ हलते, हा भाव भोळा खरा !"—
"मूर्खा, नाटक सर्व ! धर्म कुठला माशूक या पाखरा !
चोळी आखुड, अूर अर्धअुघडा, गोरा गळा मोकळा;
दावी चोपिव शुभ्र पातळ हिचा बान्धा अुभा कोवळा;
काळे केस फुगीर दाट, मधला समिन्त गोरा सिधा,—
मर्दा, कोण न चान्दणीवर अशा रे व्हावयाचा फिदा !"
"यांचे जे यजमान त्यांप्रति कुणी कां रे असें लक्षिना !
का ते धार्मिक अर्पिती बहुत कीं विद्वद्भटां दक्षिणा !
ही तों स्नान करी नि अेक तुळशी भावें पुजी प्रत्यहीं,
ओव्या चार म्हणे, तयांतच बघे धर्मांतलें सत्य ही.
—भृङ्गा, तू रसिक कृतघ्न दिसशी ! बा पङ्कजा सुन्दर,
भक्तीचा प्रभु चाहता, तुजशि तो देअील का अन्तर !"

[library stamps with handwritten numbers]

दुबे



चन्द्राची युवतीमुखास अुपमा देती कशाला कवी
हें पूर्वी न मला रहस्य कळलें. चित्रांतलें हें मुख
पाहूनी मज ती अपूर्णच गमे. चन्द्रास हें लाजवी,
कीं याच्यावर निष्कलङ्क विहरे बुद्धीसवें कौतुक.
आकाशीं ढग फाल्गुनी विखुरतां कापूसराशींपरी
खेळे चन्द्र लपाछपी अुडुगणांसङ्गें, दिसे तो सुखी;
अभ्राचें छत होय पातळ यदा पाअूस झाल्यावरी
फैलावे स्मित सौम्य गुप्त रविचें साऱ्या नभःश्रीमुखीं.
दृश्यें सुन्दर आणि अप्रतिम हीं, तैसें तुझें दर्शन;
दृश्यें मोहक चिन्तनीय जरि हीं तैसे तुझे लोचन;
कां सौन्दर्यचकोर पाहुनि तुला मानील तो हर्ष न !
आहे काय पुढे भविष्य भय तें नाहीच, सङ्कोच न.
छाये, चोरुनि मी न ठेविन तुला, येथे रहा वा दुरी,
या जीवास पुरे दिली क्षणिक ही अुद्बोधिनी माधुरी.

[ ६ ]

दैवा, निर्धन राहुं दे मज नको ख्याती, परी दे मला
अशी थोर सहिष्णुता, रसिकता अैशी कुणी प्रेमला;
काही तींत नसो अलौकिक असें काव्यात्म वा सुन्दर;
या लोकीं सुख मध्यमक्रमच दे, न स्वर्ग ये भूवर.
हा सारा अपयोगवाद! न रुचे निकृष्ट वाञ्छा अशी.
चालेल प्रतिबिम्बिला तरि हवा हातीं नभींचा शशी.
खद्योतावलि नावडे, मज हवी नेत्रांस जी दीपवी;
ती तेजस्तनया हुतात्महि करो पाडूनि शीर्षीं पवी.
होवो अुत्सवमूर्ति ती जणु अुषा, वा शान्त सन्ध्यासती,
वा ज्योत्स्ना हुरहूर जी मधुर दे स्वप्नाळु जीवास ती,
किंवा दुर्दम घूर्णवायुलहरी जी अुन्च नेअी नभीं,
किंवा तैशिच सिन्धुवीचि बुडवी जी, तीजला मी न भीं.
दैन्याचा दिन दीर्घ कां यम जरी अन्तीं करी भक्षण!
सारी अुत्कटता जयांत भरली द्या तोच अेक क्षण.

डुवे



प्रातःकालिं अता तुझें नुच घडे सुस्निग्ध तें दर्शन
की ज्याच्या शकुनें सबन्ध मग तो जावा सुखाने दिन;
लाभेना तुजहातचें गरिबिचें स्वादिष्ट तें जेवण
की जेणें मुठमूठ मांस चढुनी यावें मला मीपण.
तो वेडा अभिमान, भीतिहि खुळी ती माझियाकारणें,
तो पाठीवर जीर्ण हात फिरणें, अेकेरि हाकारणें,
बाहेरील विचारपूस करणें, तें मोकळें बोलणें,
पोथी वाचुनि झोपणें—स्मरुनि हें ओलावती लोचनें.
आअी गे, हृदयास घट्ट करुनी येअूं दिलें तू मला,
सेवेला भलत्याचिया जिव धनापार्यींच लालूचला :
या वेळीं असशील आठवत तू मातें प्रभूच्या स्तवीं,
मी घेअूनि अुशास चौघडि तुझी तूतेंच गे आठवीं.
यावी झोप तुला म्हणून भजनें गायास नानाविध,
चेपाया तव पाय हाय! जननी, मी कां न गे सन्निध !

[ ८ ]

मूर्ती भव्य गभीर शान्त तुमची दे दर्शनें शान्तता,
कैलासासम तीर्थरूपच तुम्ही जीवास या वाटतां;
वन्दायास तुम्हांस हात जुळती, वाकूनि टेके शिर,
सारा आदर दाट साठुनि गळे डोळ्यांतुनि बाहिर.
या डोळ्यांतुनि सौम्य शौर्य विलसे, नान्दे तितिक्षा तशी,
राही प्रेमळ धूर्तता अनघ जी केहा पडेना फशीं,
हें औदार्य खुले विशाल निटिलीं, त्रस्तांस दे आसरा,
दुष्टांना पिळदार यष्टि सुचवी, वेळींच मार्गे सरा.
मोठे दुर्गम दुर्ग सह्यगिरिचे, स्थायी मुनी उन्नत,
कीं ज्यांच्या खडकाळ काळहृदयीं राहे जितें अमृत,
रक्षाया शरणागता न चुकती होवो किती वादळ,
यांचा आश्रय उन्च शीतल नवें दे दुर्बळांना बळ.
हा हा ! ही प्रतिमाच केवळ, अता आहांत कोठे तुम्ही !
कोठे मीहि अपात्र पुत्र ! पुरवीं का तूमचा हेतु मी !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल
सं. ...
ता. ३१.३.३६

दुवे

[ १ ]

आहे काय मनोरमे, तव जगीं सौन्दर्य लोकोत्तर !
तू सौन्दर्यसमीक्षकांस गमशी का मेनका, अुर्वशी !
भाळाहूनि तुझ्या सुरेख म्हणती दुर्गाष्टमीचा शशी,
अन् अिन्दीवर लोचनाहुनि तुझ्या शोभे निळें ठोसर.
द्यावा मान कसा न त्यांस असती जे थोर विद्वद्वर,
जे सौन्दर्यविभक्ति सूक्ष्म करिती निर्मोह न्याहाळुनी,
योग्य स्थान समर्पिती गुणमणी नानापरी चाळुनी,
विद्वद्रत्न न मी तरी तुज गणीं मी भक्तिने सुन्दर.
या लावण्यकळावती विलसती, जाया नको नन्दनीं,
होअीना परि हालचाल हृदयीं त्यां पाहतां दृष्टिने,
वाटे एक तुझेंच रूप मजला त्रैलोक्यमोलागळें,
राशी तूच म्हणून राहुं म्हणतों तूझ्याच मी बन्धनीं.
निस्सन्देह गमे अशक्यच मला तूझ्याविणें हें जिणें;
आहे काय अमूक मोहक तुझें अद्यापि हें नाकळे.

[१०]

येथे गीत सुरेल कोण दुसरें गाणार !—का थाम्बलें !
  होशी स्तब्ध, भुलेल ऐकुनि कुणी या का खुळ्या भीतिने !
  छेडावें स्वरदेवतेस असल्या जी दीनवाणी, तिनें !
गा गा मुक्त मनें ! असे स्वर तुझे अुन्मादले लाम्बले
की माझ्या प्रतिभेस पल्लव फुटुनी येतील त्यांच्या बळें.
  तूझा कण्ठ मदीय काव्य मिळुनी रङ्गोत तीं प्रीतिने,
  स्नेहाच्या स्वरसङ्गमांत वरुषें जावोत जेवी दिनें !
प्रीतीचें जर का प्रमोहसुख तें देवा; मला लाभलें—
मार्गी निःस्वन अन्धकार सुचवी जाणें किती अन्तर,
  आलाप स्मरणींच तो तरळुनी हेलाववी मानसा,
  स्वान्तीं बाहिरल्यापरी लुकलुके ज्योतिष्मती राजसा—
देवी, व्यञ्जन मी स्वराविण तुझ्या होअूं कसा अक्षर !
  मासे मीं बघतां अुजेड अपुरा जो ये गवाक्षांतुनी
  होअी तोहि विलीन, काय गमते ही पुण्यरथ्या सुनी !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ
सं. क्र. १०५ ११८३
ता. ३/१३/३६



[११]

आशान्तक्षण दूर दूरच असो तो माझियापासुनी
यासाठीच मनांतलें गुपित मी नाही तुला साङ्गत;
राहो प्रीति मुकीच; अल्पनच हें कीं अल्प तू हासुनी
शालीन्यें वर पाहतां न करिशी माझें मुकें स्वागत.
गौरी होतिस तू यदा प्रथम मीं मूर्ती तुझी पाहिली,
अन् ये रम्य अबोधपूर्व हृदयीं काहीतरी भावना,
पाकोळीपरि कल्पना उडत त्या लाटांवरी राहिली,
राहीं वाट पहात मी परि तुझा लागे मुळी ठाव ना.
दृष्टी रोखुनि अर्थपूर्ण बघतों मी अन्तरें कातर,
तू अद्यापि कळीच का ! न बघशी आयुर्वसन्तासही !
कैसा दिव्य असेल मादक अिथे सौगन्ध तो आन्तर,
यावी अेक तरी कधी झुळुक ती माझ्याकडे, आस ही.
जाओी क्षीणच होत आस, कर तू वेळींच बाले, दया.
तो मृत्युञ्जय गन्ध सोड अपुल्या तोण्डांतुनी मूक या.

[१२]

मुग्धे, तू तर चाललीस, अिकडे मी राहिलों अेकला.
प्रेमाचा नुसता न शब्द, कुठलें तें चुम्बनालिङ्गन,
अुष्णोच्छ्वास, परास्पराश्रु करणें वक्षावरी सिञ्चन!
दृष्टादृष्टहि होअिना सरस तू माझी जरी चित्कला.
जाशी स्वामिनि शारदे, तुजविना हा रुद्रवीणा मुका;
तू माझी मधुदेवता, तुजविना हेमन्त चोहीकडे;
जातां तू अनुकूल वायुलहरी ही नाव डोहीं अडे;
जातां जीवनमोहिनी रण बने हा जन्म वाया फुका.
हा निश्शब्द निरोप मात्र मजला होअी महाजाचक,
जाशी तू तर दूर दूर पुढल्या नादामधे गुङ्गत.
नाही मींच कळूं दिलें तुज कधी माझें जुनें हृद्गत,
कां! त्याची अवहेलनाच बहुशः जो प्रीतिचा याचक.
तत्रापि स्मित नित्य मोहक तुझें – मी काय जाणूं जगीं!
माझें अमृत गुप्त राहि हृदयीं गे वारि जेवी ढगीं.

लाटा हासत लोळती, खिदळती, आलिङ्गिती, चुम्बिती;
सोन्याची क्षितिजावरी झळझळे कीं सिन्धुजा द्वारका !
शोभे अर्ध विशाळ बिम्ब रविचें किंवा महाद्वार का !
गेला रङ्गुनि तो मुलापरि दुरी, दिग् दुक्ख तें दाविती.
आला सम्पत खेळ, वायु दमला खेळूनिया शीणतां,
लाटा पेङ्गत विस्मृतींमधि हळू जाती विरूनी सुखें;
कारञ्जें द्युतिचें पहा विरमलें, सृष्टी अता अन्धुकें;
अन्धारासमवेत शान्ति पसरे का ही अुदासीनता !
येथे टेकुनि आपुली हनुवटी हा यष्टिटोकावरी
बैसे कोण शिलेवरी ! टक अता लावी कशाला दुरी !
अन्धारांतुनि तारका कवण ती दे यास हब्ज्ञाधुरी !
याळा काय समाधि लावुनि करी निष्चेष्ट चित्रापरी !
वाजे पाअुल, तो बघे, झणि अुठे, मी देखतां देखतां
जाअी दूर तमांत तो मिसळुनी—मी राहिलों अेकटा.

[१४]

"हा रस्त्यांत दिसे न तों पटपटा सम्भाषणें थाम्बती,
दृष्टी यावर रोखिली अकटवी साशंक कौतूहल,
याची पाठ फिरे न तोंच अुसळे हेटाळणीचें हसें,
मागूनी विषदिग्ध शब्द सुटती काळीज भेदावया."
"याच्या निर्भय चारु गौर वदनीं शोभे विषादच्छटा!"
"जाअी सिन्धुतटीं दुरी, कधि बसे निर्वृक्ष मोकावरी
आशुक्रास्त पहात अुन्च गगनीं नक्षत्रदीपोत्सव,
किंवा नागर दीप हे विखुरले झाडींतुनी काजवे—"
"याला मीं पण अेकदा बघितलें, रस्ता पुसे आन्धळा,
पैसा देअुनी त्यास हात धरुनी वाटेवरी लाविलें—"
"बाळांचें बहु वेड यास, तिकडे वाडींतलीं त्या मुलें
याला फारच चाहतात; गमतें दे नित्य खाअू तयां."
"वाटे पण्डित वा कुणास भटक्या वा प्रेममानी, कवी!—"
"हा श्रीमन्त नसे. कशी अघनता ही जीवनीं वीख वी!"

आयुष्यांत कधी कधी क्षण असे येतात जेव्हा मला
 कोणाशीं कसलाहि शब्द अगदी बोलूं नये वाटतें;
माझी प्रीतिलता, जरी तुज दिसे भाअू तुझा त्रासला,
 प्राशूनी अनुभूतिची कढत ही क्षारोदकें वाढते.
पुष्पें हीस नसोत आज परि तें आल्यावरी वैभव
 देणें अन्य कुणा जिवास म्हणजे होअील वेडेपण.
आहे ना अजि सावलीस हिरवा प्रच्छाय हा माण्डव ?
 बैसूं सन्निध ही दुपारभर ये निश्शब्द दोघेजण !
काढूं आठवणी लहानपणच्या, चित्रें वघूं मागलीं,
 दृष्टी अन्धुक अश्रुपूर्ण वळवूं त्या रम्य भूताकडे;
डोळे ते मिटले, तशी हरपली मायाळु ती सावली,
 दोघेही पडलों अुन्हांत परि मी आहेंच तूतें गडे !
 —छे छे ! अेक नवीन भाव तुजला नेअी दुरी ओढुनी,
 होवो मङ्गल गे तुझें तरि, नसो माझें म्हणाया कुणी.

[१६]

द्वेशी यौवनमत्त मूर्ख तरुणा, होईल दुर्लौकिक
याची भीति न तूज, त्यांत उलटा वाटे तुला गौरव.
केव्हा लोकमतास भीत पुजुनी हातीं न ये ध्येय तें
देशी यास्तव तू झुगारुनि तया आधीच वाऱ्यावर.
ग्रासायास रवीस उन्च उडतां तो अञ्जनीचा सुत
गेले देव विरुद्ध, वज्र सुटलें, तो भूवरी कोसळे;
सीतामुक्ति करावया झगडतां तू त्या जटायूपरी
वेगानें तुजला दशानन तळीं निष्पक्ष पाडील रे.
स्वार्थी तू म्हण, लेख तुच्छ जनता तत्त्वास जी विन्मुख,
तूतें हा अभिमान, वैश्य नच मी तोटानफा मोजण्या,
बाणा हा, नच वाकणार लवही भङ्गूनि जावो भला !
रे दुर्योधन, माण्ड मोडिल तुझी ती भीमसेनी गदा.
घे माझी अनुभूति ही, तुज जिता चालेल हा मृत्यु का?
मेल्यानन्तर काय पूज्य पुजल्या गेल्या जरी पादुका !

[१७]

या लोकीं यशवन्त तोच कवि की प्रेमाळ यद्वाक्सुधा
कण्ठांतूनि तुझ्या सुरेल निघतां रङ्गूनि जाओी सभा;
होतां तींत निमग्न पार शमती नाना मनींच्या क्षुधा,
तन्द्री लागुनि अुल्लसे चहुकडे काव्यात्मतेची प्रभा.
अर्धोन्मीलित लोचनांस दिसते मूर्ती तुझी गायिके,
अर्धोन्मीलित अन्तरीं दुमदुमे अुन्मत्त तूझा स्वर—
अर्थाचा न करींच शोध तरिही तत्त्वास मी आकिर्के,
सारें सुन्दर आणि मङ्गल दिसे, काही नसे नश्वर.
होओी खण्डित गायनौघ तव तों—अन् जाणवे स्तब्धता,
येती मागुनि अन्तरांतुनि हळू तेव्हा अुसासे किती!
जागी हो हुरहूर ती, कुणिकडे हो लुप्त विश्रब्धता!
वाटे नन्दन, कल्पनीयच जरी खेंवीं धरी तें क्षिती.
व्हाया धन्य मदीय शब्द कविता कण्ठांत तूझ्या फिरो,
देवी, दिव्य समागमीं कवन हें अतृप्ततेचें विरो.

[१८]

प्राणी कोण कुठील ह्रा कुणिकडे अैटीमधे चालला?!
वेड्याचा नुसता दिमाखच पहा, दारिद्य याला करी,
श्रेष्ठाची न कुठे मलावण न वा आप्तत्व, ना चाकरी,
हा प्रेमाळ कवी तशांत, नकळे कैसा असावा मला?!
आहे प्रेमच अेकला विषय तत्काव्यांत बोकाळला,
वाचा आणि पहा किती बहकली ती भावनावल्लरी,
सौन्दर्यावर सक्त सन्तत अशी ती कल्पना नाचरी,
ये विश्वास न—कालिदासहि असो—प्रेमी कवीचा मला.
वेडा जीव निसर्गभक्त असला घ्यावा कसा मन्दिरीं,
कोणा कानगुजेल काय ! न कळे कैसा करी यत्न ह्रा,
प्रेमाचीहि विचित्र नीति म्हणती—आहे जरी रत्न हा
मेल्यानन्तर कीर्ति धारण करो याला सुखाने शिरीं.
अेकालाहि न कां दिसे तरुण हा निर्मांड साधा गुणी?!
काव्यीं अमृत कां दिसे न ! गणितीं खगोल कां वारुणी !

[२४]

"गाणें एक तरी म्हणा कवि तुम्ही श्रीशारदाकिङ्कर !
 प्रेमें मङ्गल चारु सत्य करितां गीतांत अन्वेषण,
 विश्वालाच सहानुभूति तुमची दे निर्भरालिङ्गन,
द्रष्टे, प्रेषित पूज्यपादच तुम्ही की शब्दसृष्टीश्वर."
"कोठे वैदिक सूक्तकार अथवा वाल्मीकि तो प्राञ्जळ
 श्रेष्ठ व्यास, नि कालिदास कवि तो—ओनाळ ते कोयळ !
 कोठे शाश्वत जान्हवी तर चतुर्मासी कुठे ओहळ !
ही ऐशी स्तुति शान्ति दे न, अुठवी चित्तामधे वादळ.
खाली दाट धुक्यांत कोकण बुडे, लोमे दरी खोल ती,
 झाडी दाट कुठे ! तकाकित कुठे ती पोपटी मख्मल !
 वृष्टींतूनि गळे प्रकाश तिकडे सौवर्ण निष्कल्मल,
ताम्हीं गोड विचित्र रानसुमनें वाऱ्यासवें डोलती.
 दृश्यें हीं बघतां स्वतःच कविता होतां तुम्ही या क्षणीं—
 शब्दांच्या जुळणींत काय ! कवनीं आधी हवी लागणी."

[२०]

लोण्ढा खालुनि ये वरी भरुनि तों जाअी धुक्याने दरी,
　　जाअी नागफणी बुडूनि तंव हा लागे दिसाया तळ;
　　घेती झेप घळींतुनी खळखळा फेसाळते ओहळ;
झाडी घुङ्गट घे, तृणाङ्गर्णि परी नाचे हरित्सुन्दरी.
पानाआड खुले कचोरकलगी, जोमें चवेणी फुटे,
　　लाखों सूर्यफुलें अिथे चिमुकलीं, हें किर्मिजी तेरडे,
　　हासे डोङ्गरभाग अून हसरें गाळीव जेव्हा पडे,
ओलें रान बघूनि शान्तिलहरी स्वान्तीं सुखाची अुठे.
तों येअी हिरिरी नवीन करुनी लाटेप्रमाणे धुकें.
　　अैशा दोन धुक्यांत अन्तर पडे तें आमुचें जीवित.
　　होअी अन्धुक 'काळ' विस्मृतिमधे, नाही 'अुद्या' माहित,
देअी चञ्चल 'आज' सौख्य नव हें—होअील का हें फुकें?
　　आला योग कसा अकल्पित, असा येवो न येवो पुन्हा,
　　सौख्याची स्मृति ठेवितीलच परी घाटांतल्या या खुणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......
ठाणे.



[२१]

आकाशीं नच सूचिकाग्रहि कुठे राही निरभ्र स्थळ,
काळें राक्षससैन्य हें चहुकडे विस्तारलें अम्बरीं,
झाले देव समस्त निष्प्रभ नभोयुद्धामधे तुम्बळ,
नाचे मात्र जणू सुराच असुरी—विद्युल्लता सुन्दरी.
जाळी, बीळ, गुहा, कपाट, घरटें, खेडें, दरी, डोङ्गर—
सारीं स्तब्ध! चपापलें जग नभीं पाहून हें वादळ.
सेना-राजवटींत जीवन कसें लोपे, न हो गोचर,
झञ्झावात पिसाट मात्र भवती धावे, करी जागल.
मी ओटीवर नेत्र झाकुनि पडें माझ्या बिछान्यावरी
तों अैकूं मज शीळ ये, किति तरी सुस्निग्ध गम्भीर ती!
हो आता अवतीर्ण कोण कुठुनी! हो मन्मती बावरी,
तू तेजस्विनि, कोण शुक्रतनया कीं अुर्वशी कीं रती!
आलों मोहिनि, थाम्ब थाम्ब चपले! टाकूनि जाशी कुठे!
तों "कोठे नर तू कुठे अमर ती!" ही व्योमवाणी अुठे.

[२२]

होती वस्तु असङ्ख्य सुन्दर जरी काव्यकृतिप्रेरक
होओी प्रेरक गे स्मृतीच मजला तूझी मनोवेधक;
त्या पुण्यस्मृतिभोवती विरचितों शृङ्गार रङ्गीत मी,
लोभे पाहुनि थाटमाण्ड जन, मी गौरीच चित्तीं नमीं.
    भूषावेषतऱ्हाप्रसङ्ग फिरवीं मी बाह्य खाणाखुणा,
    सूक्ष्मत्वें बघतां तुझाच दिसुनी आदर्श येओी कुणा;
    कोणी धाष्ट्यर्थ करूनि नांव सुचवी की ओळखीचें तुझें,
    मी हें सिद्ध करा म्हणूनि म्हणतां घेओी त्वरेने दुजें.
माझें पाहूनि या सुनीतरचनीं कौशल्य किंवा यश
जाती बोलुनि कौतुकें कुणि कुणी "हो शारदा या वश";
अैकूनी स्तुति मर्मभेदक अशी मी "काय हें!" जों म्हणें
तों "वृत्ती तुमची विनीत" म्हणती, "शोभे असें बोलणें."
    तूतें ही कविता कळेल तरि का हृद्रक्तनिस्यन्दिनी!
    वाची मार्मिक कल्पना लढवुनी गे कोण दैनन्दिनी!

म्हातारे कवि सात पाहुनि जिला आनन्दुनी बोलले:
"प्रेमाचा अवतार भूवर नवा झाला असे या क्षणीं,
नेअूं तेथ अुपायनें म्हणत की 'ते स्वस्ति सुस्वागतम्!"
ती का तू क्षितिजीं मदीय दिसशी चेतोहरे तारके!
स्वर्गींची कविताच तू द्युतिमयी दूरस्थ हे देवते,
आत्म्याचें तव मञ्जुगान अथवा त्वन्द्रावना-नर्तन
दोन्हीही मजला अगोचर, परी क्षीणांशु हा अवढा,
आधारास धरूनि तन्तु असला स्वर्गास येअीन मी!
प्रेमक्रूस पहा कसा मिरवितों खान्द्यावरी मी सदा,
कोठे मार्ग अुजू अरुन्द न कळे जो ने तुझ्या मन्दिरीं;
केव्हा "त्यागिशि काय तूहि मजला देवा!" असें वाटतें,
हा क्षीणांशु तुझा अनर्थसमयीं तेव्हा मला धीर दे.
अंशु क्षीण परी पुरेल मज हा. तारे, रहा सुस्थित.
वाटे गे भय धूमकेतुपरि तू होशील अन्तर्हित.

[२४]

आली कृष्णचतुर्दशी, ढग नभ व्यापूनि हे टाकिती,
  अिन्द्राचा रथ चालला घडघडा की व्योमपन्थें गमे,
  ये गेहास करूनि दिग्विजय की अुन्मत्त हो विक्रमें,
नाही वीज सुनील ही, फडफडे त्याची पताका किती !
कोठे पामर जीव भूवरिल हे येथे दिवे लाविती,
  यांचें तेज चढूनि दीपविल का स्वर्ज्योतिंना त्या श्रमें !
  हीं पोरेंच, फटाकडे अुडवुनी यांची जिगीषा शमे,
चन्द्रज्योतिच लावुनी दिपवुनी डोळ्यांस हे टाकिती.
माझें कार्य पुढील थाम्बवुनि मी बाहेर डोकावतां
  चित्तांतूनि विचार हे चमकुनी जाती निघूनी त्वरें;
    येती थेम्ब तशांत, काय गगनश्री अश्रु ढाळीच ही !
का माझी स्मृति होअुनी तुज सखे, मोदांत नादावतां
  चिन्तेने म्हणतेस, घालविशि का तू दूर जीवित्व रे !
    देवी, दिव्य अशी स्मृति प्रकटतां माझी दिवाळीच ही !

[२५]

तेव्हा भेद मुलांमुलींत कुठला ? ती मोकळी सङ्गत,
खेळाडूपण अेक, त्याविण दुजा तेव्हा न ठावा गुण;
खेळायास भिडू कुरूपहि मिळो, खेळांत ये गम्मत;
वाटे अर्थ न "मोहिनी, शशिमुखी!" ग्रन्थान्तरीं वाचुन.
स्वप्नाळू नवतींतच प्रकट हो स्त्रीत्वप्रभामोहनी;
बाला रूपमती, अुदात्तचरिता, श्रीशारदा तैं गमे;
डोळ्यांतील अवर्ण्य गारुड, मुखाविर्भाव बिम्बे मनीं,
ध्येय प्रेय बघूनि अेक युवक प्रेमीं भ्रमे विभ्रमें.
दृष्टी आणिक ती चळे अुसळतां तारुण्य कार्यक्षम,
तेव्हा अूर अुभार तो अुपजवी संवेदना नूतन,
श्रोणी पुष्ट, निमूळती हरिकटी, जङ्घोरु शुण्डोपम,
तेजःपुञ्ज मदालसा! तिजसवें वाटे सुखा अन्त न.
अन्तःस्सुदरता पुढेच पटणें, ती ही असे का स्थळीं!
कां संसार विचित्र फोल म्हणती ! मायाच का फाकली!

[२६]

वाटेना कविता लिहीत असतां काहीच, ती सम्पतां
जीवाला हलकें गमे, सुख नवें लाभे पुनर्वाचनीं,
कच्चें मुद्रित शोधण्यांत सहजीं थोडे न होती श्रम,
हातीं पुस्तक बान्धलें बघुनि हें झालें गमे सार्थक.
हें हातीं धरिशील काय पण तू ? तेव्हा तुझ्या हृत्सरीं
आवेगें अुठतील काय लहरी ? वाटे मला काळजी.
"हा माझा कवि, काय मोहक लिही!" देशील शेरा असा
का "भाषा अगदीं असंस्कृत किती! काही चमत्कार न!"
चित्रग्रन्थ जयांत मी निजमनःसृष्टी असे चित्रिली,
लोकांच्या हृदयीं बसेल ठसुनी आशा अशी वाटते.
ओवाळूनि तुझ्यावरूनि पण हा दीपाप्रमाणे दिला
मीं सोडून बुडो तरो डुलत वा हा लोकगङ्गेवर.
काव्यीं सुन्दरता रुचे तुज, न कां काव्याहुनी जीवन!
तें होअील विशेष हृद्य असतां सौन्दर्यभोजी मन.

[२७]

"तो काव्यात्म खुळा पहा कवि अहो" असें कुणी बोलतो,
आली पाहुनि मासिकांत कविता हेवाहि वाटे कुणा,
अेकान्तांत कुठे रसज्ञ विरळा आनन्दुनी डोलतो,
टीकाकार कुणी दुरूनि मिळवी अैकीव खाणाखुणा.
मीं 'काव्यं यशसे' म्हणूनि धरिली नाही करीं लेखणी,
किंवा अर्थ हवा म्हणूनि नकली स्तोत्रें न मीं गाअिलीं,
साङ्गाया अुपदेश ही न विदुषी—माझी कला देखणी,
प्रीतीची कविता कशास लिहिली ? कोणास ही वाहिली ?
काव्यीं भाव अनन्य झाकुनि पहा तूझ्यापुढे ठेवितों,
वस्त्रें झाकुनिया अुपायन जसें थोरापुढे ठेविती,
येती नित्य अुपायनें तुज किती ! तू पाहशी देवि, तों
येती सेवक, यास नेअुनि कुठे कोठीमधे फेकिती.
माझें काय निवेदन ? क्षणच तू ल्यावे अलङ्कार गे,
साङ्गूं काय अता कशास ? अिथुनी जातों नमस्कार घे.

[२८]

सृष्टिग्रन्थ अनन्त जो समजुनी वाचूं बघे कौतुकें,
राज्यें जिङ्कुनि कीर्तिदुर्ग अथवा बान्धावया जो बघे,
जाती भङ्गुनि त्यापुढे सहज तीं स्त्रीभ्रूलताकार्मुकें,
वेळीं तो ललनेस खेळविल, ती स्वातन्त्र्य त्याचें न घे.
केलें कार्य विशेष काय जगीं तू प्रेमांत वाहावुनी ?
प्रेमाचीच सदान्कदा गुजकथा रेखाटिली कागदीं,
या विक्षिप्त तऱ्हेकडे रसिकही येतात का धावुनी ?
कोठे दाव कलाचमत्कृति तुझी या ह्रस्व काव्यांमधी.
बाबा, चञ्चल राजनीति असते, लावण्यलक्ष्मी तशी;
काळालाहि न जें गणील वर तू काही असें अन्तरीं;
अन्तःश्रीच पहा खरी सहचरी, रूपें नसो उर्वशी,
सोडी ही न कुणास भूवर, तया स्वर्गीं सवें ने वरी.
हाला जाण जणू हलाहल, पहा पाणीच हें जीवन—
जिन्कीं मी मदिराक्षि, तूजच जरी तापे सभोतीं रण.

[२९]

ज्या छायेस्तव मीं तुझ्या विनवण्या केल्या, वृथा जाहल्या,
गे लावूनि जिवास मी किति तुझें नैष्ठुर्य तें घेतलें !
'माझें दैव असेंच !' मन्त्र जपतां प्राणावरी नेतलें,
गेलें दुक्ख थिजूनि आणि सरसी डोळ्यांतल्या आटल्या.
गेला काळ, सुधारली स्थिति, बुजे क्रूर स्मृती मागली,
माझ्यापासुनि तोंच चोरुनि दिली अन्यास छाया तुवां,
अेकाशी निखळूनि जोडुनि दिला तो तू दुज्याशी दुवा—
थोडीशी रुजली कुठे जखम तों वाहूं पुन्हा लागली.
काही या पुढती तुला जर कधी द्यावें मला वाटलें
त्या वेळीं तर तू कृपा करुनि ती सद्वासना आवरीं,
राहो दूरच शान्ति, मीठ जणु तें होअील घावावरी;—
सांङ्गूं काय कसें तुला हृदयिं जें माझ्या असे दाटलें !
आत्मप्रौढि अुगाच कोठवर ही रे मत्सरी कीटका !
प्रीतीने तुज यापरी हिणवितां घोटाळतो जीव कां !

[२०]

देवा, दुस्सह काय हाय दयिताचाञ्चल्य हें राक्षसी !
जो मी शम्भर शत्रु येअुनि जरी माझ्यासवें झुन्जले,
ते घेवोत यथेच्छ सूड, लवही न स्वत्व माझें ढळे—
त्या माझीच करी क्षणांत अबला ही आज दैना कशी !
पूर्वी तीव्र कटाक्ष मारुनि जरी ही नित्य विन्धी मशी,
तेव्हा मत्त पराक्रमोन्मुख करी, सामर्थ्य दे आगळें;
दुर्लक्षेंच अता हतप्रभ करी; येथील आशा गळे,
अन् स्वर्गींहि, पुरूरव्यास ठकवी जी तीच ना अुर्वशी !
भासे चञ्चलताच मूर्त मजला स्त्रीजात ही तेवढी !
केला रञ्जित अेक चित्रपट मीं रम्य प्रकाशीं तिच्या,
टाकी त्यावर ती स्फुलिङ्ग, सहज क्रीडा पहा प्रीतिच्या !
मागे रङ्ग करी कसा सजवुनी ती भावना वेगडी !
जाअी ज्योतिमधे पतङ्ग जळुनी, नाही दुजा लाभ रे !
आशेची बघण्यास राख मजला राखी प्रभू कां बरें !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वकृत ग्रंथ
सं. ७१०५६ ७१५८
ता. ३१।३।३९
ठाणे.



[३१]

दृष्टीआड न होय वस्तु न कधी जाओी मनाआड जी,
माझ्या स्वानुभवास हें न पटतें, वाटे परी काळजी,
कीं माझ्या 'प्रिय * * *'वर, तळीं 'स्नेही तुझा प्रेमळ'
पत्रीं शब्द असे मला न दिसले, गेलीं दिनें पुष्कळ.
माझा अेक गरीब मित्र दिवसां कष्टूनि अध्यापनीं
रात्रीं नाम मदीय घे न चुकतां, सप्रेम चिन्ती मनीं,
केव्हाही असला विचार तुझिया चित्ता शिवे काय रे!
मित्रा, जीव तदा तुझा गतसुखस्वप्नीं निवे काय रे!
का गट्टी जुळली तशी निखळली विद्यार्थिकालांतली!
शङ्का अुद्भवतांच हीं बघ जळें डोळ्यांमधे दाटलीं;
मैत्री शक्य नसे नवीन जडणें जातां सुखी शैशव,
मी कञ्जूष अुरीं अता दडवुनी ठेवीं जुनें वैभव.
दुर्भाग्यांत अनाथमायकलिजा जाणें—नको दृश्य तें!
हा हृद्भङ्ग कशास! याहुनि बरें निष्प्रेम आयुष्य तें.

[३२]

मित्रा, कां धरिलेंस मौन ? अितुकी का प्रेमवल्ली तव
होती नाजुक की वियोग शिवतां सारें तिचें वैभव
होअी राखच ! वात घातकच तो त्याला न माया दया,—
नाही का अुपकार फेड करण्या वा देणगी द्यावया !
सम्बन्धी तुझिया विचार अवघे माझे सदा जागृत
जाणों नैष्ठिक दास तत्पर तुझ्या सेवेस अव्याहत;
स्वार्थी वा अनुदार फार म्हणजे ही अेक हृद्वासना—
दे सौख्यांश तुला पुरूनि अुरला ही अेवढी याचना.
पक्ष्यांनी त्यजिलें, हिमेंहि भरलें, निष्पर्ण झाडावरी,
अैशा त्या घरट्याहुनीहि तुझिया शब्दामुळे हो जरी
माझें चित्त अुदास आणिक सुनें, ज्याने दिला आश्रय
पूर्वी स्नेहसुखां अनेक — नलगे आता तयाचें भय !
मित्रा, बोल तथापि, बोल म्हणजे जातील शङ्का लया,
ज्यापूनी हृदया मदीय करिती माझे किती हाल या !

[३२]

आणी मध्यनिशेस जागृति मला तूझी स्मृती अुत्कट,
कोठे तू असशी जुन्या संवगड्या, कोठे अता कष्टशी !
अन्धारीं मम जीव हा हुरहुरे बाल्यांतुनी गुङ्गत,
राहे गोड विषण्णताच हृदया वेढूनि अस्पष्टशी.
पक्षी मी असतों तरी अुडुनि मी भेटीस येतों झणी,
शाळेंतूनि तुझ्यासवें फिरुनि मी गोष्टी जुन्या साङ्गतों,
तेथे ओळखिच्या जुन्या कितितरी गोष्टींचिया शोधनीं
कोणीही जरि ओळखी न अपणां, नादांत त्या रङ्गतों.
अैकायास तिथेच आतुर असें मी कोकिळेचा स्वर,
वेडावूनि तयास वाढवितसूं त्याची तदा आर्तता;
वाटे मात पुन्हा करूं कडक त्या रामा शिपायावर,
अन् सम्भावित बन्धनापलिकडे खेळूं, करूं आर्षता.
मित्रा, येअुनि सर्व हें करिन मी, स्थानींच शाळा असे,
कोठे तू पण ! बाल्यवेडहि तसें तूतें असे वा नसे !

[३४]

माझी ठेव निदान ओळख जुनी—मैत्री नसो आपुली !
 याचें सङ्कट काय तूज पडलें ? मागीतलें काय मीं ?
पूर्वीची विनती न कां विसरशी ? ती आस होती खुळी;
 'सारें माफ !' म्हणूनि पाहुनि मला होशी अशी कां श्रमी ?
गौरी होतिस तेधवा, अजुनिही हो त्या तुझा आठव,
 मूर्ती रम्य झग्यांतली चिमखडी, आवाज तो कोवळा,
ती सागत्य धिटाअिची चवकशी, तें मञ्जु वाक्पाटव,
 अन् अव्याज शिशुस्वभाव हसरा, ओढाळ अन् मोकळा.
होती त्या क्षणिं सावली पदतलीं, बागेंत तूझें गृह,
 "तुम्हां कोण हवें ? न ते घरिं. कुठे साङ्गूं ? चला दावितें"
मागे सारित केस, येअुनि अुन्हामध्येहि तू साग्रह
 पत्ता साङ्गितला खुणावुनि दिशा, "जा जा असे त्या तिथे."
अन् आता बघशी न तू विसरुनी जाणों जुनी ओळख,
ती माझ्या मन-कर्णिकेमधि असे की शुद्ध गङ्गोदक !

का नाहीतच सुस्वरूप तुझियाहूनी स्त्रिया भूवरी !
का आहेतच सर्वही विमुख त्या ? जों तू दुरी ठेविशी
तों तेढेपण हें पहा हृदिं जसें क्षारत्व सिन्धूदकीं,
साहूनी अपमान खोल हृदयीं ही प्रीति वाढे पिशी.
होतां पेटुनि खाण-तेल भडका, पाणी जरी शिम्पिलें
तें पाण्यावरती तरङ्गुनि जळे, ज्वाला बसेना, अुठे;
जैसा दीप विझे तसा न वणवा वा सूर्य झञ्झानिलें;
बोले भानु, "कितीहि तोण्ड फिरवो पृथ्वी, न कक्षा सुटे."
येथे सीच शशीसमान घिरट्या घालीं तुझ्या भोवतीं,
अन्तर्व्याधिमुळेच लागति मनीं आशेस नाना कळा;
अन् पुष्पांस अनेक चुम्बित अली वाऱ्यावरी पोहती
लाभे त्यांस 'रसज्ञ' थोर पदवी—वा न्याय हा आगळा !
तू डोळे भलतीकडे फिरवुनी मर्मास या भेदिशी,
हे पुष्पाङ्गि, रसज्ञ मार्मिकच तू, कां रक्त माझें पिशी ?

[३६]

तेव्हा तू म्हटलें, "तुम्ही समजवा, आहां कवी आपण.
आहे हें रमणीय रूपक परी थोडी नडे गूढता"—
होती मीं रचिली तुझ्याचवरती ती काव्यगुम्फा पण;
साङ्गें मी विवरूनि तों वर चढे किञ्चित् तुझी भ्रूलता,
नेत्रांतूनि कुतूहलान्वित तुझ्या वर्षे सुधा नूतन,
अन् प्राशी अुमलूनि हृत्कुमुद हें आकण्ठ ती कौमुदी,
आनन्दें वदनेन्दु सुन्दर तुझा तेजाळ होतां क्षण
ये तत्काळ अुचम्बळूनि हृदयीं कौमारभावाम्बुधी.
होतां भेट अता पथांत पुसशी, "ते ते कुठे राहती?"
देतां अुत्तर जीव दाटुनि गळीं आवाज हो घोगरा,
जाशी तू लहरीमधे झरझरा जैशी नदी वाहती,
मीही विद्ध जिवापरी हळुहळू तेथूनि जातों घरा—
कोठे हाय अता मला घर तरी—आकाश हा मण्डप
अन् माथ्यावर मातृछत्रहि नसे, चोहीकडे आतप.

[३७]

होतीं चाळित मासिकें तव दिसे छाया तुझी हासरी—
अन् जाअी हृदयांत होअुनि किती गे कालवाकालव !
पाहूनी छवि लोक बोलतिल, "ही भूशुक्रतारा खरी !"
कोणी चोरुनि चुम्बितीलहि घरीं, त्यांचा न हेवा लव.
तू आहेसच विश्वमोहक तशी ! शालीन तोरा किती !
हें लावण्य अवर्ण्य कां न हृदया देअील आन्दोलन ?
कां वैषम्य हवें तुला जर कुणी हृत्सम्पुटीं राखिती,
घेती श्रीधर वा कलाधर कुणी पायीं तुझ्या लोळण ?
माझा प्रेमनिवेदनेंच सगळा हा घात केला पहा.
केलें तें नसतें तरी न जडती आजीव अशी व्यथा.
छायाचित्र गतस्मृतींस अुठवी, देअी मनस्ताप हा !
गेली मुक्ति समीपतेस मुकतां, गेलीच ती दिव्यता.
दुर्दैवें निखळे दुवा पुनरपी तू जोडिशी न स्वता,
ही छाया विरहीं घडी बसविली मोडूनि टाकी अता.

[४०]

जातांना रमणीय या सुवसना मी जों पथीं पाहतों
जाओी होअुनि खोल दुस्सह असा माझ्या मनीं दाह तों;
आत्मतृप्त, अुषारुणोल्लसित या चन्द्रप्रभाशीतल,
यांच्या केवळ दर्शनें तपनवत् कां होय अूर्वीतल ?
माझी होय अशी स्थिती कठिण ही वर्णूनि साङ्गूं कुणा ?
घावांच्या अुघडूनि अन्तर अता कोणास दावूं खुणा ?
कोणी अर्थ अिथे करील मलता—'जी–तीवरी हा भुले';
कां वाटे अवधूत मी जगिं असें ? बोलूं कुणाला खुलें ?
घेशी तू न सहानुभूति धरुनी भक्तास या सन्निध,
देती यास्तव ताप या विधुमुखी जीवास नानाविध.
आहे सुन्दर शारदा जगिं अता माझी मला वाटुं दे,
मी जाओीन बघुनि यांस पुढुनी अैटींत माझ्या मुदें.
आता हाय परन्तु यांस बघतां घे पेट अन्तःक्षुधा,
अन् हीतें शमवील अेकच तुझी दुष्प्राप्य ती दृक्सुधा.

तूतें केवळ अेक रङ्गित छबी वा शैलमूर्ती कुणी
जी लावण्यखनी असूनिहि असे निर्जीव, हें मानुनी,
नेत्रांना सुखवीत कां व निववूं वृत्ती कलाकौतुकी !
छे ! मानव्य तुझें जिवन्त बघतां वाञ्छा सदाची भुकी.
किंवा कां न गणूं तुला गगनिंची तारा कुणी दुर्लभ
व्योमीं कृष्ण विशेष धीरसुख दे दृष्टी जिची सुप्रभ !
आटोक्यांत दिसूनि मोहवुनि तू देशी झुकाण्डी पुढे,
तू निश्चिन्त चतूर गुङ्गतच जो पाण्यावरूनी अुडे.
झञ्झावात सुटूनि हा चहुकडे मोठा धुळोरा अुठे,
मी माळावर वादळीं गवसलों, येथे निवारा कुठे !
येअी तोच वळीव पाअुस करी हा पाण-मारा जवें,
सृष्टीचा मळ तो धुवूनि नटवी तीतें नव्या वैभवें.
झाले भग्न तरू तरी चहुकडे ही शान्ति, अुत्साह हा !
आशांनो, तुटुनी पडा ! नयन हो वर्षा ! किती दाह हा !

[३८]

रूढीचाच समाज दास, तुडवी निष्पाप भावाङ्कुर,
वाटे घोर अवर्षणेंच सुकलीं प्रीतीसवें आसवें;
स्त्रीसौन्दर्य दिसे न तोंच चिडुनी मद्दृष्टि हो निष्ठुर,
मी वेताळगिरीवरी भटकतों अस्पष्ट भूतासवें.
होअी अन्धुक शुक्र, पूर्व अुजळे, नादांत मी हिण्डतों
तों भासे चढणीवरी कुणि चढे श्वेताम्बरा आकृती;
होअी धप्धप काळजांत, वळतां अेका शिळेआड तों
काव्याची अधिदेवता जवळुनी जाअी मनोज्ञद्युती.
नान्दे कर्पुरगौर गोल वदनीं सम्पन्नता, मान्यता;
राज्ञीवैभव, आणि शोधक तरी दृष्टि:स्वतः मोघम;
भाळीं कुङ्कुमबिन्दु अुन्च बसुनी दावी सुखी आढ्यता,
मुक्तांचीच सुबद्ध पङ्क्ति विलसे ओष्ठीं गुलाबोपम.
मी प्रेमास तुझ्या अपात्र, मग कां हें आस लावी स्मित ?
मी भूतापरि तेथुनी निसटतां झालीस कां विस्मित ?

[३९]

माझी होशिल काय ! शब्द सहजी टाकूं नये टाकिला
तारुण्यामधि अेकदाच तुज तो— तों जाहलों निष्प्रभ !
चातुर्यें जर गाढ भाव असता मौनांत मी झाकिला,
तूतेंही कळतें कशावरुनि गे की मी तुझा वल्लभ ?
हातांतूनि सुटूं नये निसटुनी गेला सुटूनी शर,
होता तो शर काय ? हार, धरिला तू का न त्याला अुरीं ?
तूही अिन्दुमती न, कां बिचकशी ? नातें किती सुन्दर
मी तूझा अनिरुद्ध तू मम अुषा ! होती किती माधुरी !
नाही का तुज शक्य तों विसरणें वेडेपणाचा क्षण ?
माफी कां न तुझ्या अुदार हृदयीं ? का मी महापातकी ?
कोठे पूर्विल ती अगत्यममता ? होशी कशी निर्घृण ?
स्थायी भाव असूनि येथ रतिचा कां शोक या नाटकीं ?
कोठेही अनिकेत मी भटकतों माळावरी अेकला,
चैत्रीची मधुकौमुदी न मुदिता, सन्तप्त भासे मला.

[४०]

जातांना रमणीय या सुवसना मी जों पथीं पाहतों
जाअी होअुनि खोल दुस्सह असा माझ्या मनीं दाह तों;
आत्मतृप्त, अुषारुणोल्लसित या चन्द्रप्रभाशीतल,
यांच्या केवळ दर्शनें तपनवत् कां होय अूर्वीतल ?
माझी होय अशी स्थिती कठिण ही वर्णूनि साङ्गूं कुणा ?
घावांच्या अुघडूनि अन्तर अता कोणास दावूं खुणा ?
कोणी अर्थ अिथे करील भलता—'जी–तीवरी हा भुले';
कां वाटे अवधूत मी जगिं असें ? बोलूं कुणाला खुलें ?
घेशी तू न सहानुभूति धरुनी भक्तास या सन्निध,
देती यास्तव ताप या विधुमुखी जीवास नानाविध.
आहे सुन्दर शारदा जगिं अता माझी मला वाटुं दे,
मी जाअीन बघुनि यांस पुढुनी अैटींत माझ्या मुदें.
आता हाय परन्तु यांस बघतां वे पेट अन्तःक्षुधा,
अन् हीतें शमवील अेकच तुझी दुष्प्राप्य ती दृक्सुधा.

तूतें केवळ अेक रङ्गित छबी वा शैलमूर्ती कुणी
जी लावण्यखनी असूनिहि असे निर्जीव, हें मानुनी,
नेत्रांना सुखवीत कां व निववूं वृत्ती कलाकौतुकी ?
छे ! मानव्य तुझें जिवन्त बघतां वाञ्छा सदाची भुकी.
किंवा कां न गणूं तुला गगनिंची तारा कुणी दुर्लभ
व्योमीं कृष्ण विशेष धीरसुख दे दृष्टी जिची सुप्रभ ?
आटोक्यांत दिसूनि मोहवुनि तू देशी झुकाण्डी पुढे,
तू निश्चिन्त चतूर गुङ्गतच जो पाण्यावरूनी अुडे.
झञ्झावात सुटूनि हा चहुकडे मोठा धुळोरा अुठे,
मी माळावर वादळीं गवसलों, येथे निवारा कुठे ?
येअी तोच वळीव पाअुस करी हा पाण-मारा जवें,
सृष्टीचा मळ तो धुवूनि नटवी तीतें नव्या वैभवें.
झाले भग्न तरू तरी चहुकडे ही शान्ति, अुत्साह हा !
आशांनो, तुटुनी पडा ! नयन हो वर्षा ! किती दाह हा !

[४२]

हौशीने फिरतां प्रदोषसमयीं वाडींत तू अेकटी
केशारूढ तुझा गुलाब पडतां मागे पथीं खालती
देतां मूर्ति मदीय तें अुचलुनी हातीं तुझ्या सादर
गे तूझी भुवअी चढूनि न पडो आठी कपाळावर;
रात्रीं झोप न ये म्हणूनि बसतां ज्योत्स्नेंत सौधावरी
स्वप्नें जागृतिचीं पुढील तरतां नेत्रांपुढे धावरी
ज्योत्स्नागीति विषण्ण अैकुनि "अता पीडा कशी टाळुं ही!"
दारें आपटुनी चिडूनिच तुवां जावें न अन्तर्गृहीं;
सोनेरी पसरे अुषास्मित, करीं तार्जे 'मनोरञ्जन',
दृष्टीला पडतां अनाम कविता ही 'प्रेम का काञ्चन!'
शङ्का येअुनि वाचुनी बघुनि ती रूक्ष स्वरें त्रासिक
'जळ्ळं तें!' म्हणुनी झुगारुनि दुरी द्यावें न तें मासिक;—
यासाठीं, (न कळे तुला किति तुझ्या प्रीतीस मी अर्हित),
प्रेमाने मम मूर्तिगीतिकविता होतील अन्तर्हित.

[४३]

कोणाऱ्याहि पुढे कधी न नमलें गर्विष्ठ माझें शिर,
केलें मीं न खुलें कुणासहि कधी दुर्भेद्य हृन्मन्दिर.
माझ्या आन्तर जीवनास न शके काढूं कुणी बाहिर,
स्वातन्त्र्यप्रिय आत्मनिष्ठच सदा मी अद्रिवत् सुस्थिर.
तेजस्वी पडतां कटाक्ष तव मी झालों मनीं कम्पित,
वाटे थेट जिव्हार विन्धुनि तुवां केलें मला अङ्कित
तू गेलीस जवें, सर्वेच हृदयीं प्रक्षुब्ध हो सञ्चित,
गेला अूर फुटून, पूर सुटला, हो लोक आनन्दित.
तो आनन्द मला कुठे ! न परते गेलीच ती देवता.
लोकांचेंच करीत सान्त्वन परी तो ओघ वाहे अता.
माझें मी बनलों प्रचण्ड थडगें जाणूनिया नेणता,
झालों अुन्च जगीं कशास जर मी राहायचा अेकटा.
तें सायुज्य कधी घडेल पुसतों साहूनि ही दुर्दशा,
तों ये अुत्तर मर्मभेदि वरुनी—हेटाळणीचा इशा !

[४४]

ओलावा लवही न ज्यांत असलें हें पत्र माझ्यापुढे
पाहूनी मन कां पुन्हा हुरळतें ! वेडें खरें बापुडें !
हें हस्ताक्षर गोल रेखिव अुभें काढी जुनी ओळख,
हो आन्दोलित जीव मागुनि जसा कानीं तिच्या लोलक.
देखावा बदले—कुठे रण ! कुठे ती मर्मदाही झळ !
सोन्याने खजुरी अलङ्कृत अिथे, वाहे झरा निर्मळ;
गाअी मञ्जुळ गीत बुल्बुल सुखी प्रच्छाय पर्णान्तरीं
अन् दे दर्शन शाद्वलीं परिचिता नावेक ती सुन्दरी.
प्रीतीची पहिलीच अूर्मि, न बघे जी वर्ण वा सम्पदा,
प्रीती जी पहिली खुळावुनि नरा त्या पोचवी चित्पदा,
ती प्रीती जडली तिथेच जडली, अन्यत्र जाणें तिला
नाही शक्य असाच लेख विधिने आहे हृदीं ठेविला.
कालानन्तर दीर्घ आलिस गडे सुस्वागतम् या अिथे !
मी प्रश्नोत्तर काय गे तुज करूं ! हे पत्रिके, स्वस्ति ते !

[४५]

विद्युद्दीप पथ प्रकाशित करी तेजाळतां भार्गव,
मी सज्जांत अुभा धरूनि कठडा, चौकांत डोकावुनी
होतों लक्षित अन्धकार, खवळे चित्तांत चिन्तार्णव,
दैवाच्या धपडा वयांत पहिल्या नानापरी खाअुनी.
होणें शक्य न तोण्ड-ओळख तदा अस्पष्ट मीं अैकिलें,
"आहे कोण तिथे ?" परन्तु न दिलें प्रश्नास मीं अुत्तर.
थोडीशी वळवूनि मान अपुली मागे कुठे पाहिलें
छाया, मूर्ति दिसे कुणी जवळ तों, ये ओळखीचा स्वर.
"वेड्या, मी परतन्त्र; कां वळविशी तेढेपणें तू मुख !
ये, तूतें निमिषैक मी जवळ घे, कष्टू नको वा रुसूं.
आशेला जगवावयास वरुषें घे हें क्षणाचें सुख,
भेटूं अन्य कुठे, जुनी स्मृति तदा हर्षासवांनी पुसूं."
छाया जाय दुरी करूनि मजला तन्द्रींतुनी जागृत,
लोटे स्वप्नसुखास त्या युग जणू—आशा दिसे ही मृत.

[४६]

केला प्रश्न मुठींत जीव धरुनी मागे तुला अेकदा:
 झालों अुत्तर अैकुनी न पुरता भग्नाश मी वाग्यते.
झालीं पांच अता तयास वरुषें, मी भोगितों आपदा
 आता काय करूं तरी ! न हृदयीं बाणेच वैराग्य तें.
लक्ष्मी नित्य तुला प्रसन्न, नि गुणें तू शोभशी शारदा,
 होशी पोक्त गभीर शान्त नि तुझी कीर्तीहि फैलावते,
माझें साहस अन्तरीं तडकलें, अदृश्य बैसे गदा,
 लाटांच्या पकडींत चित्त दुबळें भावार्त हेलावतें.
होतां भेट निघे कधी गृहकथा अन् होय सम्भाषण,
 पूर्वीचिंच दिसे अगत्य नयनीं प्रेमास जें चेतवी;
तू माझ्यास्तव, मी तुझ्यास्तव जणू आलों जगीं आपण,
 तू सङ्गीततरङ्गिणी तर तुझा सोत्कण्ठ मी गे कवी.
रङ्गे लज्जित वारुणी, न तिसरें माणूस माळावर,
तू तो प्रश्न विचार, सिद्धच असे ओठावरी अुत्तर.

[४७]

शुभ्र, श्यामल, पीत, ताम्बुस गिरी नीलाम्बरीं पाङ्गले !
  आग्नेयीस सुवर्णदुर्ग, अलका प्राचीन, लङ्काच वा,
  कैसें अुन्नत सूर्यपान झळके, अुत्क्षेप किंवा नवा,
रथ्या सर्प गमे, गदूळ भवती हीं साचलीं पल्वलें.
आम्बें तृप्त सतेज, मात्र गळती लागे अता मोहरा,
  ओल्या कुन्द इवेंत सौरभसुखोच्छ्वासास हे सोडिती,
  झाडींतून नदी लपूनि छपुनी वाहात सर्पाकृती
दावी ती सखिसङ्गमोत्तर दुरी आदर्शवत् चेहरा.
व्यापी शान्ति, अुदास शान्ति अपणां, आभाळ हें फाटलें,
  स्थानीं अुच्च अशा चढूनि सगळा अुत्साह कां मावळे !
  वारा पार पडे, न शब्द वदवे कीं जीव त्याचा गळे;
तूही शान्त अबोल, काय न कळे चित्तीं तुझ्या साठलें.
  रङ्गे अम्बर हें पहा, मन कशासाठी तरी आतुरे—
  आला सम्मत दीस, बोल मधुरे, झाला अबोला पुरे.

[४८]

दारीं येअुनी ती म्हणे, "मज करा झाल्या चुकीची क्षमा;"
दारीं धावुनि मी म्हणें, "चल सखे, ये, आंत ये या गृहीं!
चित्तद्रावक आणखी फिकट हा अद्यापि कां चन्द्रमा!
गेला राहु पळूनि घेअुनी सर्वें ती सौख्यहारी दुही."
स्फुन्दस्फुन्दुनि ती रडे, तिज रडें तें आवरेना मुळी,
येअीना जवळी म्हणूनि मग मी गेलों तिच्या सन्निध;
पोटाशी धरिलें तिला म्हणत कीं "ही काय शङ्का खुळी!"
मागे सारुनि केस मीं वठविली लाली मुखीं चुम्बित.
आला धीर हळू हळू, मजवरी पुष्पाङ्ग टाकूनिया
झाली ती स्थिर, भेटले क्षणभरी डोळ्यांस डोळे तशी
"जाअूं द्या मजला अुठूनि" भिअुनी अुद्गारली मत्प्रिया,
"जातें मी अपुली—" परन्तु सुटते वेङ्गेंतुनी ती कशी!
लागे चाहुल, तों तशीच अुठली तोडूनिया वेङ्ग ती—
अन् मी जागृत होअुनी वर बघें तों माड ते पेङ्गती.

[४९]

कष्टी, क्षीण, निराश, पाण्डुर दिसे जी मृत्युशय्येवरी
ती स्वप्नांत मला अजूनि कितिदा शैला पहा भेटते.
नाचे, हूडपणें हसे जणु रमे शस्याङ्गणींची परी,
बाल्यींचे किति खेळ खेळुनि मला ती भेटवी थेट तें.
तैशी तूंहि सखे, मला कितिकदा स्वप्नामधे भेटशी,
लाडाने हितगूज बोलत सदा आशा नवी लाविशी,
प्रत्यक्षीं भलता प्रकार करिशी पाहूनि नेमें फशीं,
मागूं न्याय कुणाकडे तुजविना होअी गुन्हा त्याविशी.
स्वप्नीं तोडुनि देहबन्ध म्हणती आत्मे सुखें भेटती,
तेवी वर्तविती भविष्य, सहसा मर्त्यांस जें नाकळे,
अेकाङ्गी परि कल्पनाच गमते ही, होय माझी न ती,
माया फोल कळूनि अन्तर कसें मागूनि हें जाकळे!
ती निद्रा पडती न जींत फसवीं स्वप्नें, कधी येअिल!
द्याया शान्ति मला कुशींत अपुल्या प्रेमें कधी घेअिल!

[५०]

सोन्याचें तव हें घड्याळ सखये, देशी मला कासया ?
याची हीणवणूक कां ! खचित हें शोभे न रङ्कास या.
आहेत स्मृति ज्या खचून भरल्या दुष्पूर माझ्या मनीं
होती सर्वच त्या सुवर्णमय गे स्पर्शें तुझ्या साजणी.
या निर्जीव अलङ्कृतीवर पहा न प्रेम माझें ठरे
दिव्यालङ्करणें खुले बहु जरी सौन्दर्य तूझें खरें;
या तूझ्या विभवीं कितीक असती जे अंशभागी तुझे
दे हें त्यांस, मला तुझें स्मित पुरे, काही न देऔं दुजें.
लोकांनी म्हटलें किती जरी मला 'हा क्षुद्र निष्काञ्चन !'
चिन्ता ती न करींच मी, मनिं कधी त्याची शिवे आच न;
सोन्याचें स्मित मुग्ध हार्दिक तुझें राहील माझ्यावर
सन्तोषें अमरावतींतहि तरी राहीन मी पामर.
का या भेटिमधे असे ध्वनि तुझा काही तरी मङ्गल ?
सोन्याचा क्षण सावधान धर हा, जाऔल हा चञ्चल.

मराठा ग्रंथ संग्रहालय
सं. ....
ता. 31.3.36
ठाणे



[५१]

होतें प्रेम तसें तुझें मजवरी पूर्वीचपासून की !
झालों अेक कसे अता अुभयता अलिङ्गनें चुम्बनें !
झालों धन्य अनन्य रत्न मिळतां प्रक्षुब्ध सिन्धूदकीं,
मृत्यो, अमृत लाभलें मज अता कोठेहि येथून ने !
मी काहीतरि बोलतों, त्वदधरीं आहे सुधा का सुरा ?
मी-मी हा पडतों, स-सावर मला तू बाहुपाशामधे !
राहूं देच अुरास अूर भिडला, गे या वियोगातुरा
प्याला आणिक पाज, अन्तिम गती दे, गाढ आराम दे !
का हें स्वप्नच ? हाय भेद तुझियामाझ्यामधे केवढा ?
मी निष्काञ्चन काजवाच, धनिके, वर्णें गुणें शुक्र तू !
कोठे अुन्च सुवर्णचम्पक, कुठे निर्गन्ध मी तेरडा ?
होतां तू मम मी शतक्रतु नव्हे, होअीं सहस्रक्रतू !
या लाजा, नच तारका; अरुण हा तेजोनिधी पावक,
चालूं सप्तपदें धरीं कर करीं, हो देव साहायक !

मराठा ग्रंथ संग्रहालय
५५८३
ठाणे

[५२]

सन्ध्या शान्त अुदात्त सुन्दर ! असें होअील ना जीवित ?
गेला पूर गढूळ ओसरुनि तो, कालान्तरें पाहतां
येथे ओघ दुभङ्गती पण पुढे होतात हे मीलित,
मध्ये पाण्डुर वाळवण्ट, अगदी अेकान्त अन् शान्तता.
प्रीतीला प्रिय फार जो वर नभीं तेजाळ तो दीप हा;
तेवेनाच परन्तु रात्रभर हा तार्‍यांतला अग्रणी,
वृक्षाग्रावर त्या फिकी चिमुकली तारा ध्रुवाची पहा,
अेकाकी न तिचें स्वरूप भरतें कोणाचिया लोचनीं.
हें तूझें हिमशुभ्र पातळ सखे, आनील ही कञ्चुकी,
हे तेजाळ अथाङ्ग नेत्र, वदनीं वर्णच्छटा पाटल,
तू सन्ध्याच जणू ! कुठूनि मग ही अस्वस्थता त्वन्मुखीं ?
वारे मेघ न येथ, कोठुनि बरें चित्तीं तुझ्या वादळ ?
बान्धुं त्या डगरीवरीच घर गे जेथे दिसे जङ्गल—
"तेथे ? काय असे अहो निखननस्थानांत त्या मङ्गल ?"

वाटे स्वास्थ्य न येथ, जाअुं म्हणशी जा थण्ड देशास तू;
   सन्धी ये अनुकूल, आणिक हवा तूतें हवाफेर तो.
जा, वाटेल मला जरी कठिण तें गेल्यास अुल्लास तू.
   जाशी तू कविताद्युती मग पडे अन्वार चौफेर तो.
माझ्यासाठि रहा अिथेच तुजला अैसें म्हणूं मी कसें !
   घालूं माळ कशी बळें अडकवूं बेडींवजा शृङ्खला !
तू घेशील तिथे नवीन पदवी अत्युच्च, येथे नसे;
   जा जाशी तर तू, असे मजसवें तूझी स्मृती मङ्गला.
वेडा तू म्हण, वाटतें परि मला काही तरी कां भय !
   हें तूझें मधुखिन्न हास्य न शके माझी करूं खातरी.
पत्राने तव 'काम'-पूल जवळी आहेच निस्संशय,
   येअूं मी ! अधनास काय भलती ही हाय अिच्छा तरी !
हा अन्त्यक्षण चालला फिरविशी तू त्रासुनी कां मुख !
हा प्रीत्युत्कट भाव का तुज गमे वा ग्राम्य वा कामुक !

[५४]

तू पद्मापरि फुल्ल चारु दिसशी, पद्माच किंवा अुषा !
  हर्षाची प्रतिभाच का तव मुखीं ही अुच्च विद्युद्युती !
अैशी कान्ति बघूनि पार हरपे कामी जिवाची तृषा,
  दावी मोङ्गळ शालु हा खुलवुनी त्वद्रम्य अुचाकृती.
ही मूर्ती न तुझी छबीच, नुसती छाया तरी अेकच !
  शेजारीं दिसतात भव्य गुरु हे—हेही किती सुन्दर !
हंसश्वेत दुभङ्गले वर शिरीं हेलावणारे कच,
  पाणीदार अथाङ्ग नेत्र जणुं कीं गम्भीर नीलाम्बर.
अन् हे ! मित्रच हा—किती बदलला श्रीकान्त वाचस्पती,
  शोभे अुन्च किती अनङ्गपुतळा हा राजाबिण्डा पहा.
का तो कार्तिक हाच ज्याप्रत तिरस्कार्थ स्त्रिया वाटती !
  आधी सुन्दर, अन् विशेष खुलतो पाश्चात्य वेषांत हा.
आहे ठाअुक काय गे तुज किती मित्रास या चाहतों !
मी डोळे भरूनी पुनः पुनरपी चित्राकडे पाहतों.

[५५]

सोसूं कोठवरी वियोग तव मी ! ये पाप माझ्या मनीं
रागदृष्टिपुढे तुझ्या नच शके राहूं अुभें जें मुळीं;
काही कृत्य करूनि भीषण गमे जावें मरूनी झणी,
पाडावेंच अुजाड देअुळ जरी देवी न ये देअुळीं.
होतों मानित सौख्य सुन्दर तुझ्या हस्ताक्षरा देखुनी
गेले मास किती निघूनि, अजुनी सन्देश ये ना कसा !
सम्पेना वनवास हाय ! वर हा अेकान्त वाटे खुनी,
चित्तीं त्वत्स्मृति राहुनी सुख नसे, मूर्ती कुठे राजसा !
डोकें जाअि भणाणुनी रुधिर हें तापे शरीरांतलें,
तो वेदान्तकषाय लागुं न पडे वृत्तीस अुत्कण्ठिता;
ये गे धावत, मार घट्ट विळखा कस्तूरिका–कुन्तले,
गोष्टी साङ्ग निरर्थ गोड अपुल्या—ती आपुली संहिता.
झालें प्रेम जिवास तीव्र चटका लावूनिया पारखें—
हे पुष्पाङ्गि, सतेज तू, मन तुझें कां गे हिन्यासारखें !

[५६]

डोळ्यांनी शव पाहण्याहुनि गमे ती मृत्युवार्ता बरी,
भासे सौम्यच काळदूत तुळितां साक्षात् कृतान्तापुढे,
फाशीची कळतां सजा कळ अुठे निःसंज्ञ चित्तीं तरी
होती पाय शिडीवरी लटलटा भारावुनी बापुडे.
आता अेक मुहूर्त, टाक पिअुनी हाला न, हालाहल;
क्रव्यादग्निचिता पुढे घडघडे गा हें नसे वोहलें.
नाही मङ्गलवाद्यघोष बघ हा, हा घोर कोलाहल,
डोळ्यांनी मरणास देख अपुल्या, भोगूनि घे सोहळे.
गेले लोपुनि चन्द्रसूर्य, नसती तारे अता जागृत,
कोन्दे धूरच धूर अेक गगनीं, मी काय पाहूं तमीं!
अद्यापि प्रळयांत या मन कसें माझें न होअी मृत!
आता मी न जिवन्त, न मृतहि मी, झालों जितें भूत मी.
जाणें शक्य मला न जेथ अुजळी आरक्त आशा दिशा,
'तू माझाच रणीं अफाट फिर जा' बोले निराशा–निशा.

[५७]

हो माझीच असें तुला विनविलें कां मी मनें अुद्धट !
घाली तो मजलाच हार म्हणुनी कां घातलें सङ्कट !
राहूं देच अपारदर्शक अता दोघांत अन्तःपट,
न स्वाभाविक हा, असेंहि म्हण जा, प्रेमांतला पालट.
प्रीतीच्या धनसम्पदेंत भरुनी त्यागात्मता राहिली
देतां प्रीति मिळेच ती, स्थिति अशी कोणी कधी पाहिली !
स्वार्थाची कुसुमाञ्जलि प्रिय हिला ती पाहिजे वाहिली,
कर्तव्याचरणीं मनास मग हो वा शान्ति वा काहिली.
तू मैनाच मनांतली म्हणुनि का कोण्डूं तुला पञ्जरीं !
तू आहेस सदा स्वतन्त्र ललिते जा चारुतामञ्जरी.
माङ्गल्यप्रद माळ घाल कुणिही श्रेष्ठाचिया कन्धरीं.
होतां सूख तुला मला परतुनी पावेल तें अन्तरीं.
गे तू आणिक जो तुझा प्रिय असा—तो मित्र माझा जुना—
दोघांची नित पायकी करिन मी, संसार सारा सुना.

[५८]

होवो वादळ भोवती कितिकदा, अुत्तुङ्ग जो स्थावर,
 घेअी हैमसमाधि शङ्कर जया रम्य स्थळीं दुर्गम,
त्या गौरीशिखरासमान अथवा जावा तयाच्यावर,
 घाला कृत्रिम अुन्च बान्ध असला प्रवृत्तिला भक्कम.
शास्त्रांतील तुम्हां न जीवन दिसे, काढूनि घ्या पत्थर,
 शब्दांचा मग कीस काढुनि चिणा त्याच्याच ते कर्दमीं;
ठेवा त्यावरती अशङ्कर असा बागूल—तो सङ्कर;
 दास्यें रूढि गणा स्वधर्म, मिरवा हिन्दुत्व वर्णाश्रमीं.
प्रीतीची चिमणीच लाट घरणें फोडी अशी शम्भर,
 अस्वाभाविक बन्धनें तटतटा तोडी कशी लीलया !
प्रीतीवीण समाजदण्डक हुके, प्रीतीच विश्वम्भर,
 स्वर्ग प्रीतिविना गमे निरय तो, वाञ्छी न कोणी तया.
दर्जा, जात, तसाच पन्थ—तुटुनी गेले पहा बन्ध ते;
तोडी ती अभिनन्दनीय !—भलतें कां हें हृदीं स्पन्दतें ?

डावी घालुनि हा कडा हलुहळू छातीवरी घेअुनी
येतों नीट घळीमधूनि चढुनी त्या विन्चुकाटयावरी,
गेलें तें कुळ-गाव दूर अमुचें झाडीमधे लोपुनी,
त्वच्छायाकृति दीसते अुमटली तेजःपटीं अम्बरीं.
अन्तश्चक्षुपुढे छवी पण तुझी रङ्गीत ही शोभते
त्वत्पर्युत्सुक आननीं टवटवी ताम्बूस खेळे नवी;
घेशी नीट शिरावरून पदरा दांतीं, अुडे टोक तें,
दृष्टी निश्चल टेकड्यावर भुऱ्या, टेकावया ये रवी.
वाद्यें मङ्गल वाजतात गमतें येती दुरूनी ध्वनी,
घारींच्या तरण्याकडेच मन कां सारें तुझें लागलें ?
फेकूनी वर माळ वाहुनि तुझ्या पायीं रिघावें झणी
जिङ्कायास भयाण दक्षिणदिशा आता अनीहावलें.
कोमेजूं बघ लागलीं वनफुलें,—सूर्या, जरा थाम्बरे !
काळोखाविण किरें या संवगडी कां अन्य आता बरें ?

[६०]

मार्गी तू दिसतां अचानकपणें अस्वस्थ झालों मनीं,
किञ्चित् श्रान्त अशा मुखावर तुझ्या आनन्द होता नवा,
होतों कांपत मी फिटूनि मनिंची गेली जरी वानवा,
होतों सस्मित मी असूनि हृदयीं ती चोरटी टोचणी.
मीं तूतें पुशिलें त्यजूनि सलगी सभ्य गृहस्थापरी,
"ही सारी प्रभुची कृपा ! बरं असे ना ?" बोलुनी अिङ्ग्रजी;
तू साभार लगेच अुत्तर दिलें "झाली दुरी काळजी".—
कांही शब्द न ये पुढे, जणु पडे ओझेंच दोघांवरी.
होतां प्रीति निषिद्ध मीं निरविली तीतें जगच्चालका,
आशेच्या तुकड्यांसवें निखनिली तीतें जिवाभीतरी;
गेलों बोलुनि, "गोड तोण्ड करण्या द्या द्या मिठाअी तरी!"—
आलें अुत्तर, "या घरीं, असति ते"—ते ! होय, तो मत्सखा !
"मी येतों" वदलों, "पुन्हा कधितरी–मानूं नका वाकुडें"—
माझे मित्र असूनि ते अुभयता—मी अेकला यापुढे !

मैत्रीचा सहजीं निघे विषय तो सम्भाषणौघामधी,
तच्चेतोनयनापुढे मग अुभी राहूनि मित्राकृती
ये तत्कण्ठ भरूनि, तो मज म्हणे: "पूजाई त्याची स्मृती,
मृत्यूनेच दुराविलें जगिं तया, दुर्वार तो पारधी.
गेले दीस किती सुखांत असतां सङ्गें जिवाचा सखा!
गोष्टी बोलत ती पहाट कितिदा होअूनि गेली बरें!
दे अद्यापि अमूर्त सङ्गत मुकी तो पूर्वमैत्री स्मरे,—
आहे भाव तसाच गाढ अमुचा कृष्णार्जुनासारखा.
झाला तो मग गप्प आणिक बघूं माझ्याकडे लागला,
जन्माचें मम होय नाटक असें शोकान्त, साङ्गूं कसें!
डोळ्यांनी बघतों दुरूनि तुज तों जीवास काही डसे,
योगांतील वियोग साहुनि पुरा हा जीव वैतागला.
ये तूझाच विचार निष्क्रिय यदा मी अेकला रात्रिचा,
मित्राचा पुरवेल अन्त, न लगे केव्हाहि तो मैत्रिचा.

[६२]

भोळा अेक किशोर हासत तुवां जाळ्यामधे ओढिला
अन् संबोधुनि त्यास अेक समयीं श्रीशारदाकिङ्कर
तू प्रीत्यङ्कुर लाविला वरसुनी दृग्वाक्सुधाशीकर
झाल्या नन्तर आणभाक तरु तो तू लीलया मोडिला.
त्याला ओठसुरा विलासचतुरे आधी तुवां पाजिली,
जातां झिङ्गुनि तो कठोर हृदयें केलें दुरी त्याजला,
"आहेस प्रिय तू परी खचित ये पत्नी न व्हाया मला"
याचा अर्थ मुळी न त्यास कळला, त्वत्प्रीति झाली शिळी.
आविर्भूत तुझ्यामधेच पहिली प्रीती तयें पाहिली
यासाठीच हलाहलासम तुझें चाञ्चल्य तो प्राशुनी
घेअी शामक रामनाम, जगती वाटे तयाला मुनी;
दावी शान्त गभीरता वरि जरी हो अन्तरीं काहिली.
तत्प्रेमास अपात्र तू कळुनि तो कष्टी असाधारण,
तू त्याला लहरींत नाम दिधलें नेमें करी धारण.

[६३]

वस्तूंचें रुचिर प्रदर्शन बघूं, तेजी स्वदेशीस ये.
वारें खात खुल्या स्थळीं विहरुं या, व्यायाम होअी स्वयें.
नेत्रांना तरि या क्षणैक रिझवूं,—श्रीमन्त का आपण ?
या हो ! कां असवां अनुत्सुक सदा ? का त्या स्थळीं काव्य न ?...
चाले वाद्यसमूहवादन अिथे अन् अुल्लसे भावना,
घेअूनी अपुलीं मुलें मिरवती कौतूहलें अङ्गना—
कां हो व्यग्र तुम्ही ? प्रफुल्ल दिसतो बाजार साराच हा !
विश्रान्तिगृहही अिथे, मग चला या घेअुं थोडा चहा...
नक्षीची मधुगन्धि चौकट किती ही चन्दनी नाजुक !
वा ! वा ! दोन ? महाग फार ! रुपया ? घे रे ! असे ठाअुक.
अुञ्ची कापड हें निळें तलम–का घामें न काखीं विटे ?
चोळ्यांना खपतें विशेष म्हणशी ? दे वार. अन् हीं चिटें ?...
नाही मीं म्हटलें बुवा तरि रिता झाला खिसा आणखी—
कां हो, त्या दुबळ्यास भीक रुपया ? विक्षिप्त हें दान की !

[६४]

होतें काय तुला ! कितीक दिसशी निर्विण्ण तू पाण्डुर !
अस्वास्थ्येंच असा कुठे भटकशी ! हें काय तूझ्या करीं !
काव्यांची तुझिया वही तर ! तुझ्या चित्तीं अुठे काहुर
पद्यीं व्यक्त करूनि तेंच करिशी ना शारदाचाकरी !
छे छे ! का मग अल्पजीवि मधुर स्वप्नांत तू रङ्गशी !
भासे दृश्य मनोज्ञ तों तुज गमे की ध्येय तेथे स्थिरे,
हो अन्तर्हित तोंच तें, मग फुक्या शोकांत तू स्फुन्दशी,
अन् सौन्दर्यभुलावणींत फिरुनी वाढे तुझें काविरें.
प्रीतिध्येय सुशान्त शाश्वत तुला लाभे न कोण्या स्थळीं,
काव्यें सुन्दर हीं लिहूनि म्हणशी अस्वस्थता ना टळे,
अेणें जाशिल मासळीपरि जिवें जी जीवनावेगळी,
स्वप्नाळूपण सोड, सोड भय, घे हें तत्त्व मोलागळें—
देहाने कर कष्ट, सोड कविता, अुड्डाण नाही नरा,
दाणा पेर, कसूनि पीक पिकवीं, रे तूज बाही धरा.

[६५]

मृत्यूचें भय बाळगूनि गमतें जीवन्त मेलों असें,
विन्चू पालिपुढे जसा अचल वा सापापुढे बेडुक,
रात्रीचे वर कोहिनूर दिसती नेत्रांस कां कोळसे !
बुद्धीलाहि असत्य सत्य पटतें, झालें कसें चेटुक;
नाही शाश्वत काळरात्र पण ही, ही दीर्घसूत्री तरी,
डोळे मीट, अुषा मनांतच पहा आरक्त सोत्साह ती,
पक्ष्यांची किलबील ती हळुहळू येअील कानांवरी,
नेत्रांतें अुघडीं यदा गिरीतरू तेजामधे नाहती.
येअूं दे मरणास येअिल तदा, आधीच हें कां भय !
येतां नीट समोर गाडुनि अुभा राहूनि लावी टक,
नेत्रींचा पडतां स्फुलिङ्ग यम तो होअील रक्षामय,
कामाला शिव, अन्तकास असशी तू त्या परी अन्तक.
चित्तांतील भुतांस गाडुनि पहा रात्रींतही चारुता;
देवांनाहि अजिङ्क्य तू, मग भिशी दैत्यांस या कां वृथा !

[६६]

धागा जाय तुटूनि, काय नच ये जोडावया तो पुन्हा !
गेला स्नेह सुकूनि पार ! कथिती हीं तूज बाष्पें मुकीं
की पाहूनि तुझ्या सुखास अजुनी हा जीव होओ सुखी,
गेला मत्सर राग वा घडिभरी राहूनि तो पाहुणा.
आता केवि करूनि देउं तुज मी माझी नवी ओळख !
तू पौरन्ध्रिक वैभवांत अपुल्या नादांत जाशी दुरी,
सङ्गें ही प्रतिमा तुझीच चिमणी खेळाडु गोरी भुरी,
मी बाजूस उभा, गमे तुज जणू प्राणी कुणी क्षुल्लक.
हो दुर्लक्ष तुझें परन्तु जनता जिज्ञासु थोडी नसे,
श्यामा चन्द्रमुखी कुणी गजगती ये खावयाला हवा,
हीतें पाहुनि शिष्ट काय करिती सम्भावना वाहवा !
वाटे यांस कुटाळकींतच दिसे कौशल्य, गोडी वसे.
माझें तोण्ड मिटूनि घट्ट परि मी घेओं, खुलेना कुणा,
साङ्गो गोष्ट कुणी कशी जुळवुनी अैकीव खाणाखुणा.

नेत्रीं बुद्धि पहा स्वतन्त्र, वदनीं आरक्त सौम्यच्छटा !
हें अव्याज निसर्गसुन्दर असें राहील का कैरव ?
येअी ही अपुल्यांपणांत तरिही घोटाळतें शैशव,
हें अुत्फुल्ल बघूनि रूप अुपजे कां गूढ ही खिन्नता !
शैला हासत पायरी विसरुनी, देअी तुला दूषणें—
"शोभे काय वयांत या खिदळणें ! निर्भीड हें वागणें !
आलें शिक्षण होत, थिल्लरपणा जाअीचना शिक्षणें !
खोड्या या पुरुषी"—"तुम्ही अुलट हीं माना महाभूषणें"...
होतों पीत चहा तिघेंच असतां सन्ध्या हिवाळ्यांतली,
केला प्रश्न तुवां मधेच मजला पाहूनि पर्युत्सुक;
मी ओळी वरच्या रचूनि म्हणतां केलें तुवां कौतुक,
गेला तो क्षण त्यास आज चवदा वर्षें पुरीं जाहलीं.
शैला आज कुठे ! तुझीं बदललीं नांवें, रहाशी दुरी,
ती आज स्मृति ये अचानक वरी अुध्वस्त माझ्या अुरीं.

[६८]

होतों मित्र न राहिलों पण अता ही काय शिक्षा कमी
की आह्वनि सुरुङ्ग तू अुडविशी ! व्हावेंच का राख मी !
झालों मी मृततुल्य जीव असुनी मैत्री निभाली यदा,
मेल्याला करण्यांत वार बघशी तू कोणता फायदा !
काटेरी शयनीं पडूनि असतां कोणी मनूचा सुत
दावी गोड सहानुभूति मजला पाजूनि शब्दामृत,
हें तूतें नच पाहवे, सुख तुझ्या सेवेस राही खडें,
कां देशी विषधूर सोडुनि असा अव्यक्त चोहीकडे !
माझ्या जीर्ण हताश भग्न हृदयीं अद्यापि तें पूर्विल
मित्रप्रेमरहस्य गुप्त अपुलें आहे, पुढे राहिल :
—मेल्यावांचुनि मी सुरक्षित न तें—हें तूज टोची भय,
अन् राहील तुझ्या अखोल हृदयीं ! वाटे मला विस्मय.
दुर्दैवें करणी तुझी तुज अता काही कळेना मुळी :
तूतें देव करो क्षमा जरि मला घाअींत देशी सुळीं.

दुवे ... ९९

[६९]

ज्याची गोड सुबोध भावकविता कोणासही तोषवी,
सृष्टींतील मुलां-फुलांस बघतां वेडाच जो हो कवी,
बोले जो 'प्रभु मी अजूनिहि अुणा' जातां प्रभूच्याकडे
त्याची वन्य समाधि रूक्ष विजनीं अेकीकडे कां पडे !
त्याचें हें थडगें भिकार दिसतें मातीविटांचें पुढे
जाअी होअुनि नांवही पुसट हें पाटीवरी बापुडें:
"आकाशांत फुलें धरेवर फुलें" त्याने असें गाअिलें—
सारें तें परि पुष्पवैभव अता काव्यींच हा राहिलें !
ज्याचीं काव्यफुलें बघूनि हसती जीं रन्जलीं गान्जलीं,
किंवा सान्त्वत ती तुक्यापरि करी ज्याची अभङ्गाञ्जली,
कां हो मर्मर-पुष्प शुभ्र न कुणी ठेवी तदस्थींवरी ?
का नारायण आपुला न कवि की येशुप्रशस्ती करी ?
रक्षी अस्थिसवें प्रिय स्मृति तुझी स्वान्तीं महाराष्ट्रभू,
बोलें वाहुनि मीहि अश्रुसुमनें की शान्ति देवो प्रभू !

मी पाहूनि विभूति दोन नमलों त्यांच्यापुढे तत्क्षणीं—
येती थोर अजूनिही सुत असे या हिन्दभूच्या कुशीं !
दोघेही गुरु-शुक्र, मित्रच म्हणा, दोघे विचाराग्रणी,
तो त्यागी कृश अेक आणि दुसरा हा राजयोगी ऋषी.
दाढीदार सतेज शान्त वदनीं गाम्भीर्य हें प्रेमळ,
अङ्गीं नाजुक सैल रेशमि झगा, टोपी शिरीं मख्मली,
त्याची क्षीण तपाळ मूर्ति, किति तद्हास्यीं महन्मङ्गल !
नेसे तो निजहातकातिवसुती कौपीन जाडी भली.
हा गीताञ्जलिने दिगन्त पसरी हिन्दीमनोवैभव,
अिच्छी पश्चिमपूर्वयोग, निवडूं पाहे खरी संस्कृती,
तो सत्याग्रहशूर वीर पडला बन्दींत सत्यास्तव,
अध्यापी नव राज्यनीति, पटवी स्वाङ्गें करूनी कृती.
हा ठाकूर रवीन्द्रनाथ मिरवे साहित्यसम्राट्, पण
गान्धी मोहनदास पाहि वळवूं दारिद्र्यनारायण.

बन्धातीत अये स्वतन्त्रहृदये, हो त्वत्प्रभा मन्द न
अन्धारांतिल कोठडींत तर ती अत्यन्त हो अुज्ज्वल
की वास्तव्य तुझें तिथें घडतसे त्याच्या हृदीं केवळ
प्रीतीचेंच तुझ्या जया, न दुसरें, बान्धूं शके बन्धन.
बेड्या घालुनिया सुतांस तुझिया कारागृहीं कोण्डिती
नान्दे कोन्दट ओल ज्या तळघरीं, जेथे सदा दुर्दिन—
त्यांच्या आत्मनिवेदनें जय मिळे देशास मागाहुन
वातारूढ दहा दिशांत विहरे तें मुक्तिची कीर्ति ती.
हें कारागृह शोककारक कसें ! हें तीर्थ कीं आपुलें !
पावित्र्यें जणु यज्ञवेदिच गमे ही भूमि मातें अहा !
मातीच्याच भुअीपरी झिजुनि हे पाषाण गेले पहा,
येथे चालुनि बन्दि तो अुमरलीं त्याचींच हीं पाअुलें.
कोणीही न पुसो खुणा, पिळवटे ज्या पाहतां आंतडें,
लेखी ही जुलमाविरुद्ध दिसते फिर्याद देवाकडे.

[७२]

दोघेही शिकलों अनेक वरुषें अेकत्र वर्गांतुनी
होतों भेटत नित्य अन् भटकलों अेकत्र रात्रींवनीं,
गप्पागोष्टि, पुढील बेत करितां गेले सुटीचे दिन,
सन्ध्याही किति शाद्वलाङ्गणिं तशा खेळामधे कर्मिल्या !
विद्वन्मान्य अशा अनेक पदव्या दोघांसही लाभल्या,
दैवें सेवक राजमान्य म्हणुनी सर्कार घेअी तुला;
दोघांची पडतां अचानक अशी ही गाठ गण्डस्थलीं
चित्ता आठवणी जुन्या हलविती त्या गोड काळांतल्या.
गेलों होअुनि लोकदास म्हणुनी मी पायचाली फिरें,
तू साहेब, बगींत सन्निध तुझ्या राणी तुझी सुन्दर !
ती कोणीहि असो, तुला न पटतें माझी गमे ओळख,
माझी दृष्टि फिरे तुझ्याच भवती तू तों तिला टाळिशी.
जा जा ! जाल तुम्ही बसूनि चढुनी त्या स्वीय गिर्याश्रमीं,
पायांनी अपुल्या चढूनि वरती गाठीन शैलाग्र मी.

[७३]

मैत्री ही मज आज सान्त दिसते जैशा जगीं वस्तु या,
  अट्टाहास करूनि मी दिन किती वांचेल ही यापुढे ?
मीही क्षीण पडें रुतूनि हृदयीं लाखों विषारी सुया,
  येअील क्षण तोहि, शान्त पडुनी जाअील हें बापुडें.
होता तो मधुकाळ आणि म्हटलें नादावुनी आपण
  "मैत्रीविक्रम दाखवूनि जगतीं डङ्का यशाचा पिटूं"—
कीर्तीचा पडसाद ये श्रुतिपथीं, मैत्री न आता पण,
  जावो ती ! सुखरूप धन्यच जगीं आहेस अद्यापि तू.
गेलें सर्व ढगाळुनी नभ वरी, फुन्जे फुगोनी नदी,
  गेले अन्धुकुनी दुरील गिरि ते, झिमूझीम वर्षा पडे,
सन्ध्या होय समाधिशान्त भवती, रन्जे वघोनी न धी,
  जाअीं मी स्थळ सोडुनी प्रिय असें कोठे नि कोणाकडे ?
वेशीच्या जवळी परन्तु दुरुनी वन्दूनि जातां तुज
मैत्री बाळपणांतली स्मरुनि घे हें अेक भावाम्बुज.

[७४]

रथ्या स्वच्छ जलार्द्र, हीं अुपवनें, क्रीडाङ्गणें पाचवी,
हे प्रासाद विशाल रम्य, तिकडे अुत्तुङ्ग घण्टाघर,
विद्यामन्दिर भव्य 'गोलघुमटा'हूनीहि जें सुन्दर,
येथे वास्तुकला सगर्व अपुलें माथें कसें अुन्चवी.
मध्ये विस्तृत पाळ-बन्द सर हें शोभे जणू दर्पण,
तारेचे रमणीय पूल झुलते, काही दुजे प्रस्तरी,
रात्रीं वीज लखाखुनी चहुकडे चन्द्रप्रभा विस्तरी,
लाभे गावकऱ्यांस मादक अिथे हें दृष्टिसन्तर्पण.
येथे केवळ राजसेवकच जे श्रीमन्त गर्विष्ठ ते:
सारीं बाण्डगुळें! स्वतन्त्र जन ते कोठे धनोत्पादक?
धन्देवन्त कुबेर राष्ट्रिय अशा शक्तीस जे साधक?
शेती अुत्तम, कां बरें मग तिथे दारिद्र्य हें तिष्ठतें?
छाती काढुनि चालतील कधि हे काबाडकष्टी जन?
नाही रान अुभें जितें, चहुकडे देखा सुकें अिन्धन!

ऐशी पोर सुरेख ही चिमखडी आहे कुणाची बरें !
तों ये चम्पकगौर चारु युवती शालीन कोणी त्वरें.
साडी नील महेश्वरी, भरजरी चोळी खुले तप्किरी,
तोडेगोठ सुवर्ण गोण्डस करीं, मूर्ती दिसे साजिरी.
  होतां मान वरी दिसे मधुरता गम्भीरता लोचनीं
  बोले ती, "चल मञ्जुबाळ !" परते बोलूनि हें तत्क्षणीं;
  लक्ष्मी ही गृहदेवताच पण कां भालीं न सौभाग्य हा !
  "रावांची गृहिणीच" तों कुणि म्हणे, "संसारशोभा पहा !"
वर्षांनन्तर आठ मीं पुनरपी त्यांना पथीं पाहिलें
लज्जारक्षक पातळांत, न जुनें ऐश्वर्य तें राहिलें.
शान्ती तीच परी मुखीं, वर तिथे येओी अुदासीनता
तों बोले कुणि, "पोर वारिल परी आता हिची दीनता."
  टाकी जी पुरुषावरी भरवसा ती हो अशी वञ्चित,
  संसारीं भलताच कां संवगडी गाठूनि दे सञ्चित !

रथ्या स्वच्छ जलार्द्र, हीं अुपवनें, क्रीडाङ्गणें पाचवी,
हे प्रासाद विशाल रम्य, तिकडे अुत्तुङ्ग घण्टाघर,
विद्यामन्दिर भव्य 'गोलघुमटा'हूनीहि जें सुन्दर,
येथे वास्तुकला सगर्व अपुलें माथें कसें अुन्चवी.
मध्ये विस्तृत पाळ-बन्द सर हें शोभे जणू दर्पण,
तारेचे रमणीय पूल झुलते, काही दुजे प्रस्तरी,
रात्रीं वीज लखाखुनी चहुकडे चन्द्रप्रभा विस्तरी,
लाभे गावकऱ्यांस मादक अिथे हें दृष्टिसन्तर्पण.
येथे केवळ राजसेवकच जे श्रीमन्त गर्विष्ठ ते:
सारीं बाण्डगुळें! स्वतन्त्र जन ते कोठे धनोत्पादक!
धन्देवन्त कुबेर राष्ट्रिय अशा शक्तीस जे साधक!
शेती अुत्तम, कां बरें मग तिथे दारिद्र्य हें तिष्ठतें!
छाती काढुनि चालतील कधि हे काबाडकष्टी जन!
नाही रान अुभें जितें, चहुकडे देखा सुकें अिन्धन!

ऐशी पोर सुरेख ही चिमखडी आहे कुणाची बरें !
तों ये चम्पकगौर चारु युवती शालीन कोणी त्वरें,
साडी नील महेश्वरी, भरजरी चोळी खुले तप्किरी,
तोडेगोठ सुवर्ण गोण्डस करीं, मूर्ती दिसे साजिरी.
होतां मान वरी दिसे मधुरता गम्भीरता लोचनीं
बोले ती, "चल मञ्जुबाळ !" परते बोलूनि हें तत्क्षणीं;
लक्ष्मी ही गृहदेवताच पण कां भालीं न सौभाग्य हा !
"रावांची गृहिणीच" तों कुणि म्हणे, "संसारशोभा पहा !"
वर्षानन्तर आठ मीं पुनरपी त्यांना पथीं पाहिलें
लज्जारक्षक पातळांत, न जुनें ऐश्वर्य तें राहिलें.
शान्ती तीच परी मुखीं, वर तिथे येई अुदासीनता
तों बोले कुणि, "पोर वारिल परी आता हिची दीनता."
टाकी जी पुरुषावरी भरवसा ती हो अशी वञ्चित,
संसारीं भलताच कां संवगडी गाठूनि दे सञ्चित !

[७६]

दावावें अबलेस तू बळ तुझें मुर्दाड मर्दा ! पहा,
घायाचा तिज हात तो अुलट तू भार्येवरी टाकिशी !
ही देवी, हिज दत्त वस्तु गणुनी देशी सुखें ताप हा;
आणि 'श्रीगुरुदेव दत्त !' म्हणुनी देवकृपा भाकिशी !
होओीना वर हात, भग्न करितां मूर्ती कुणी देअुळीं,
होओीना वर हात, लाजहि कुणी घेतां सतीची पथीं,
देतां लाथ तुला वरिष्ठ न हृदीं तें रक्त तापे मुळी—
सुल्तानी सगळी घरांतच तुझी, अन् आर्यपत्नीप्रती !
देशी प्रीति तिला, स्वतन्त्र वश हो पैक्यास जी चेटकी,
घेशी काढुनि रीण हौस म्हणुनी शालू तिला पारवा,
देशी हीस विवाहबद्ध म्हणुनी सौभाग्य लत्तेंत की !
घेशी काळजि झाडणीपरि हिची—वा आर्यसंसार वा !
दासी होअुनि व्हा न दासजननी ! हे मर्द मर्दायला
देवींनो, कलिकालिका प्रखर व्हा, ल्या रुण्डमाळा गळां.

कांपे भूमि पुनःपुन्हा थरथरा, अग्नी जिभा हाल्वी,
सिन्धु द्वीप गिळूनि नाचत सुटे मत्त नृपाकापरी,
पाहीं चोहिकडे भयार्त जनता मुङ्ग्यांपरी धावरी,
बैसे घावच पूर्वराष्ट्रहृदयीं, खुण्टे गती मानवी.
आपत्ति स्मरणीय ही परि फिकी क्रान्त्यांपुढे त्या पडे,
गेल्या होउनि पश्चिमेस न परी झाला जगाचा लय :
जीर्णांच्या प्रलयांतुनी अुपजतीं तत्त्वें नवीं निर्भय,
ही मुक्तिप्रगतिध्वजा वर चढे, वाऱ्यासवें बागडे.
रक्ताच्याच नद्या वहात सुटल्या माजे अशी यादवी,
हो सम्राट्कुल दुष्ट नष्ट बुडुनी, हो रङ्क अग्रेसर,
अन् देशोधडिला प्रभुप्रतिनिधी तो जाय भिक्षेवर,
चोरांना पळवूनि राष्ट्र अपुली स्वायत्तता दाखवी.
आम्हांला अवतारराज्य अथवा सुल्तानशाही नको;
रङ्कांचें समतासुराज्य मिळुं दे तें, आन काही नको.

[७८]

वाक्स्वातन्त्र्य असे म्हणूनि वमतां ज्वाला मुखांनी तुम्ही,
राळेचाच परन्तु डोम्ब पसरे चोहीकडे धूम हा !
मेघाडम्बर अम्बरीं गडगडे, विद्युत् करी ताण्डव,
खाली म्लान महीवरी तृषित या बिन्दूहि कां ना पडे !
आक्रोषींच अुदात्त खर्चे तुमची सारी पडे रुस्तुमी,
गोविन्दात्मज माधवास म्हणतां वाचाळ भीरू महा—
आतां कां वरदक्षिणेस हटतां, दाक्षिण्य दावा नव,
जा प्रेमास वरा, घनार्थ करितां कां दृष्टि आसांकडे !
काव्यात्मत्व वरूनि तें अुतरुनी ये मात्र युष्मद्द्दर्दी,
ध्येयांची सगळी मिरास अथवा जाणों तुम्हां गावली,
यायोगेंच सुधारकी वदतसां दुर्दम्य हीं दुर्वचें,
छे, कल्लोळ करी प्रचण्ड तुमचा आव्योम शब्दाम्बुधी !
द्यायाला दिसतां समर्थ न तुम्ही वा अूब वा सावली,
कारुण्यास्पद मात्र मी समजतों तारुण्य हें तूमचें !

[७९]

हल्ले होउनि चोरटे जन किती जाती बिचारे जिवें !
  पाठीमागुनि मारण्यांतच सुरे सारें दिसे पौरुष,
  ते संरक्षक दुर्बलांस बघती हाणावया अङ्कुश,
आहे अेकच देश, मानवपणा चित्ता कुणाच्या शिवे ?
होअी ती अमरावती यमपुरी पन्नास कोसांवरी,
  तेथे काफिररक्तपातच रुजू वाटे खुदाच्या पुढे;
  नाना देव पुजूनि हिन्दु मरुनी जाती खुळे बापुडे—
हे आहेत असङ्ख्य, मारुनि किती माराल यांस हसें ?
कुवृत्त श्रवणीं पडे, पडुनिही या वाद्यकोलाहलीं
  जो तो 'मङ्गल सावधान' गजरीं झिङ्गे, नसे सावध;
  तेथे निर्बळ धर्मबन्धु अमुचे, होअी तयांचा वध—
येथे तों सुमुहूर्त, आज तिनशें लग्नें म्हणे जाहलीं !
  लागे हिन्दुस अेक घाव तर ये लक्षावधींना कळ,
  अैक्यावीण अशा वृथाच जगतीं निर्जीव सङ्ख्याबळ !

[८०]

प्रीती शुद्ध असूनि मङ्गल न कां या भावनेला गती ?
अेकामागुनि अेक मीं करमिले आशेवरी वत्सर
की होअिल अखेर शून्य अमुच्या दोघांतलें अन्तर;
होती आस खुळीच, आणि युवती अत्यन्त बेलाग ती.
माझे नेत्र तिच्याकडे तर तिचे अन्याकडे लागती,
माझा मित्रच तो तथापि हृदयीं पेटेच तो मत्सर,—
मी माणूस, गळेल रक्त न कसें लागे जरी नस्तर ?
वाटे [illegible]ाद त्यांतुनि जगे प्रीती जुनी जागती.
तो धन्य प्रणयी ! सुखांत बहरो त्याची तरी बाग ती !
आशीर्वाद असा दिला परि बघे प्रारब्ध तें वाकडें.
जीवांची मिळणी न त्यास बघवे, हेवा जिव्हारीं जडे,
अन् पाडी प्रणयास राख करुनी भूमीवरी आग ती.
अन् आम्ही विरहांत शोक करितों दोघेहि दोन्हीकडे
दावूं गूढ सहानुभूति कशि मी ? सन्देहडोहीं पडें.

मराठी ... सं. ... क्रमांक ...
३।११।३५



[८१]

दृष्टीला निशिगन्धहार पडतां तूं ओढिला तो बळें;
वक्षाशीं धरिलास हुङ्गत किती गे ध्यान तें शोभलें.
औत्सुक्यें पुशिलेंस हासत, "कुठे हा लाटिला आपण ?
होतें तें तर काव्यगायन ? अता सारेंच साङ्गा पण".
आधी गाङ्गरलों कसा, परि पुढे केला कसा धीर मी,
काव्यौघांत कसा मला विसरलों जों सोडिलें तीर मीं,
श्रोत्यांच्याहि सहानुभूतिपवनें पैलाड नेलें कसें--
अैकूनी तव लोचनीं चमक ये, ये कौतुकाचें हसें.
आता कोण घरास मी परततां ? आता न काव्य स्फुरे,
स्कन्धीं कर्कशराजकारण पडे, स्वारस्य काही नुरे.
झाली गार सभा, विपक्ष हरुनी होअूनि गेला श्रमी,
गेले ठेवुनि लोक हारगजरे--यांचें करूं काय मी ?
अम्बाड्यास तुवां स्वतांच करूनी वेणी तदा घातली,
घालीं मीच अता छबीस तुझिया ही पुष्पहारावली.

[८२]

छे ! तें काय विचारितां ! खचित हृत्स्पर्शी असे लेख हा....
हा स्वादिष्ट असेल सौम्य तरिही आता न चाले चहा.—
काजूलाडु नको, नकोच चिवडा, कां त्रास देतां फुका !
झालें सर्व यथेच्छ. काय ! अुठुनी येथूनि मी जाअुं का !....
बाकी, अेकच बैठकींत लिहिलीं पन्नास पानें अशीं !
सार्‍यांना रडवील मोहवुनिया आहे कला ही कशी !
"—तो पुष्पासम शुद्ध आणि हळवा—तें अीश्वरी वैभव—
न्यायाचा तंव खून होय, सजवी हें पुष्प त्याचें शव !"...
ही काव्यात्मच कल्पना.—"पण अुरे मागे तयाचें यश !
आधी अूस निघे पिळूनि मग या लोकांस लाभे रस"—
तो मेला सुटला, कुणास सुटला आहे जगीं मृत्यु हा !
यासाठी रडतात लोक—अपुली ठेवील कोण स्पृहा !
यासाठी मिळतील तींच म्हणतां, घ्यावींत नाना सुखें....
पेठा हा कुठला ! असें ! गृहिणिने केला घरीं कौतुकें !

दुर्वे

[८३]

तूझी छत्रपते, अजूनि न कळे लोकोत्तर श्रेष्ठता,
देहाशी तुळिलें न हेम, दिधले स्वप्राण धर्मास तू !
तू केलास सजीव धर्म सहुनी प्राणान्त दुक्खें स्वता,
राजांतील दधीचि होअुनि कसा केलास आत्मक्रतू.
राजांचाच पराक्रमी सुत, महाराष्ट्रांत सम्राट् पुढे—
प्रासादांत अजूनि वंशज तुझे सत्तासुखें भोगिती—
जें रक्षा तव रक्षितें स्थळ कुठे तें ना कळे बापुडें,
हें वृन्दावन सान भग्न तव का ! शम्भो ! अनास्था किती !
जेव्हा ती घटना अवर्ण्य घडली या पुण्यतीरावरी
भीमे, काय थरारलीस न हृदीं, का तप्त झालीस न !
केवी विस्मृति शान्तशीतल अशी तूझ्या मनाला बरी !
क्रव्यादग्निच ही समाधि अुठवी माझ्या मनीं भीषण.
वाया शोक नको, गुढ्याच अुभवा, तो काळ मेला जुना.
भस्मांतूनि अुठूनि दिव्य पुरुषा मृत्युञ्जया, ये पुन्हा.

देवा, जन्म दिला कशास्तव महाराष्ट्रांत या रे मला !
कोठेही मज राष्ट्रबन्धु न दिसे, मी अेकला, अेकला !
प्राणी पुच्छविशाणहीनच असे मिथ्याभिमानी जन,
सारे शिष्ट कुटुम्बदासच ! महाराष्ट्रीय कोणीच न.

मागो रावण भीक, (वन्द्यच सदा ती ब्रह्मदीक्षा जुनी !)
मुक्तद्वार अिथे, अुदारपण हें गाजे अम्हां गान्जुनी.
अेकामागुनि अेक हाय परकी सत्तेस जातों बळी
बाकीचे म्हणतों, अुरूंच पुरुनी, जाअूं न आम्ही तळीं.

कोणीही सवता सुभाच अपुला स्थापावयाला बघे,
हें स्वातन्त्र्यच ! तत्त्वमूढजनता त्याचा कसा जाब घे !
चाले सङ्घटना अखण्डित महाराष्ट्रीय लोकांमधे
आम्ही सर्व मुमुक्षु भाण्डुनि मरूं सद्धर्मनिष्ठामदें.

वैऱ्याने लचका अचानक महाराष्ट्रांतला तोडिला,
सारें शान्त ! न अैकुं ये कुठुनि कां उच्छ्वासही सोडिला !

[८५]

देअी सिञ्चुनि आपुलें रुधिर जो राष्ट्रास सञ्जीवन,
कण्ठी जीवित शान्तिहीन खपुनी घोरांमधे भीषण,
त्याचें भङ्गुनि राष्ट्र जात असतां त्याच्याच का वंशजें
व्हावें मत्त सुखासवें ! मन कसें त्या पामराला भजे !
अज्ञानांत असंस्कृतींत पडले त्यां अुद्धरूं या चला
यासाठी वनवास पत्करुनि जो फेकूं प्रभा लागला,
अैश्वर्याकुल आज तत्प्रतिनिधी लक्षी प्रकाशास न,
त्याचें वन्य कुठुनि राहिल जरी प्राचीन धर्मासन !
गेलें का अमुचें कृतज्ञपण तें सारें लयाला जुनें
ज्याच्यावीण जिणेंहि केवळ कसें वाटे जिवाला सुनें !
चाले जें कलहात्मजीवित परी चोहीकडे भूवरी
राष्ट्रीयत्व तयामध्ये झगडूनीं जीवन्त ठेवूं तरी
स्वातन्त्र्यांत मिळेल भाकर सुखें सर्वांस सेवायला—
ओवाळीन जिवास त्यावरुनि मी राष्ट्रार्थ जो भागला.

जावा होउनि अेकजीव अपुला कां हो महाराष्ट्र न !
साधया शिवलोकसङ्ग्रह पुणें तें ब्राह्मणी पात्र न.
दृष्टि प्रान्तिक ठेवण्यांत दिसतें राष्ट्रीयतेला भय—
व्हावा सिन्धच कां विभक्त ! पण तो स्वायत्ततेचा जय !
अूर्दूचें परचक्र पैठणपुरीं कां ! राजभाषाच ती.
कां हो ती मग लश्करीं मिरविते ! वा ! कम्पुभाषाच ती.
क्रान्ति श्रीनगरींच कां विहित ती ! चिन्ता प्रजेची पडे.
कां ती अिष्ट न होय भाग्यनगरीं ! तेथे तहाने नडे.
खिस्ती आङ्ग्ल कसा प्रवेश मिळवी जेथे अुभा विठ्ठल !
"नाविष्णुः पृथिवीपतिः" प्रकट हें अन् तो सदा मङ्गल.
चोखा कां न शिरूं शके ! प्रभु न तत्स्पर्शें अुरे पावन !
पीराला नवशी कसा द्विज ! अहो, सर्वत्र नारायण !
घेणें पोटच जाळण्यास जर वा देणेंहि विद्यामृत
व्हावें ग्रान्थिक शिक्षणें हृदय हें तेव्हा कसें जाग्रत !

[८७]

राङ्गेने किति शिस्तशीर पुढुनी जाती स्वयंसेवक,
पोशाखी दिसती न केवळ, पहा झुन्जार हे वेंचक.
यांचा निर्मम कर्मयोग भगवा येथे अुभारी ध्वज,
साङ्गे मन्त्र शिलङ्गणांत "शरणं हिन्दुत्वमेकं व्रज".
दावी हा गणवेष अेक समता लोकांत जी ये नव,
येती भाव अुचम्बळूनि बघुनी अैसें चमूवैभव,
अश्वारूढ कुणी पुढे मिरवतो अग्रेसर क्षत्रिय,
बोले तों कुणि, 'भोसलेकुलज हा राष्ट्रीय धर्मप्रिय'.
सीमोल्लङ्घन हें असें नव पिढी आता कराया निघे,
राष्ट्रदृष्टि नवीन ठेवुनि पुन्हा स्वत्वास जिङ्कूनि घे,
या खान्द्यांवर शोभती पण अशा लाठ्याच का आपणा ?
येतां तो क्षण, बन्दुकांस समरीं देतील का सामना ?
मोठे पायिक शूर हे पण कुठे त्या व्योमसञ्चारिणी ?
छातीचा तरि कोट भक्कम पुरा तो होअुं द्या या दिनीं.

[८८]

जेव्हा लोक सुखासनीं पहुडती तेव्हा कुणी ज्योतिषी
नेमें लावुनि दूरदर्शि नयनीं आकाश शोधी निशीं,
ज्योतिर्जीवन जाणण्यांत रमतां चिन्ता स्वताची नुरे,
ज्ञानाचा अुपयोग तो नच पुसे, त्या ज्ञानयात्रा पुरे.
रङ्गे भूवरतीच अन्य मनुजसृष्टीचिया शोधनीं,
राहे ज्यापरि पद्मपत्र अुदकीं तैसाचही तो जनीं,
होवो राष्ट्रभविष्य रम्य म्हणुनी ज्ञानार्थ हा कष्टत
शोधूनी अवशेष, कल्पुनि करी हा मूर्त भूताप्रत.
तो जो भूवर राहुनीच विहरे दूरस्थ तेजांमधी
त्याला लोक अुदात्त अुच्च गणिती, तो राहुं द्या त्या पदीं.
खाली पाहत अंस्थि शोधित फिरे नादांत सर्वत्र हा,
याला कोण गणी अुदात्त ! म्हणती विक्षिप्त याला पहा.
घ्या याचे गुणकर्म नीट बघुनी, वन्दा निखन्दा पण
'विद्यासेवक' हाच आणिक खरा हा वैदिक ब्राह्मण !

31[illegible]
31/3/3



[८९]

वर्षे सत्तर लोटलीं, अजुनिही स्वातन्त्र्य रक्षावया
  शस्त्रें घेउनीया जुनाट अपुलीं ये 'रास' वेगें रणीं;
शत्रू फार सुसज्ज, शोधक नव्या साह्यास विद्या तया,
  कैंचा हा टिकणें ! करी तरि बळें युद्धास अङ्गेजणी.
झालें कोसळला रणावर पहा झुन्जूनि सावेश हा,
  त्याला देतिल बण्डखोर पदवी त्याचे अता बान्धव.
ये चैतन्य पुढे कधीतरि तदा घ्यातील यातें अहा !
  हा निन्दास्तुतिच्या रिघे पलिकडे, मी खिन्न याच्यास्तव.
घे घेरूनि सुधारणासुख मला, सोयी तऱ्हेच्या किती !
  वाटे हाय ! परन्तु हीन दुबळें ओशाळवाणें जिणें.
धोक्याचें पुरवेल कष्टद जिणें जे अफ्रिडी भोगिती—
  वाटे स्त्रैणच हा सुशिक्षितपणा त्या क्षात्रतेजाविणें !
नेटाने असहाय रे झगडतां स्वत्वार्थ तू सङ्गरीं !
माझी वान्झ सहानुभूति, कुढतों मी माझिया पञ्जरीं.

[१०]

वृद्धाची अजि सत्तरी अुलटली आश्चर्य तत्राप हा
कष्टूनीहि निरुक्तशोधन करी, अुद्योग मोठा पहा!
आहे काय भविष्य अुज्ज्वल पुढे विद्येस पौरस्त्य या!
शङ्का यास शिवे न संस्कृतिच की ही जावयाची लया.
आता होअिल वर्गयुद्ध, न टळे, वक्ता कुणी ओरडे.
जा जा चालुनि कष्टकार जन हो! मारी मुखें कोरडे.
पाही अेकच मुक्ति जागतिक ती साधावया या रुचे,
राष्ट्रीयत्वच बुद्धिभेद करुनी फोडूं बघे आमुचें.
होती आस अुषःप्रभा जिकडुनी येअील ती मङ्गल,
चैतन्यें नव राष्ट्र जागृत अता होअील अूर्जस्वल,
आता ये तिकडून काळढग हा त्या टोळधाडीवरी
अन् वाटे प्रलयान्धकार पडतो शेजारराष्ट्रावरी.
आम्ही मागसले अशस्त्र दुबळे, चित्तीं अुदासीनता
डोळ्यांना पुढती दिसे अवदशा ती सर्वनाशी अता.

जाअूं शोधुं कुणीकडे नच कळे आता समाधान मी !
सारें सोङ्ग चहूकडे बघुनि हें होतों मनस्वी श्रमी.
केल्या क्षुद्र मनोज्ञ वस्तु परक्या देशांत कारागिरीं
त्यांना वापरण्यांत धन्य गणतों अन् संस्कृती साजिरी.
अुद्यानीं फुलपाखरें विहरती वर्षाऋतूच्या अुन्हीं
आम्हांलाहि तसें रुचे मिरवणें रङ्गेल नादावुनी;
नाही हें जर साधलें तरच त्या होती मनीं यातना,
आता मानवता समस्त बसली येअूनि वेषांत ना !
झाला हा परतन्त्र देश, म्हणतों ही योजना अीश्वरी !
आली दिव्य सुधारणा वसुमती पाश्चात्य की सुन्दरी !
साङ्गे गाअुनि शान्तिपाठ जन हो, सौन्दर्य साधा स्वयें,
साधा हा नव शाक्त धर्म, घडुनी अुद्धार ये निश्चयें !
तें स्वातन्त्र्य कुठे ? पराक्रम कुठे ? तें ज्ञानसंशोधन ?
स्वार्थत्याग कुठे ? स्वकष्टपरता ? हो नष्ट चेतोधन.

[१२]

पाले, कन्द, मुळ्या कुठे जमवुनी हिण्डूनि रानींवनीं
 बैसे माण्डुनि मावळा, कुणितरी घेअील आशा तया.
पाहूनी दुरुनीच पौरजन हे जाती निघूनी झणी,
 कोणा ठाअुक काय नांव, कुठला तो धर्म पाल्यांत या ?
अङ्गीं घोङ्गडिची निरस्तर अशी वण्डी, न बाह्या तिला;
 मुण्डासें कसचें ? मलीन दिसते माथ्यावरी चुम्बळ;
लङ्गोटी करि लाज राखण, कधी तो कम्बरेचा विळा;
 भासे संशयि दीन मूढ वदनीं सोशिकतेचें बळ.
सह्याद्रीपरि या सनातनच तू माझ्या सख्या बान्धवा,
 राज्यक्रान्ति कितीकदा घडुनिही तूझाच अुद्धार न.
कोणी राज्य करो, समानच तुला अेकादशी–पाडवा,
 रे अूठ द्विज हो ! मनूंतिल नव्या हो क्षत्रिय ब्राह्मण !
शेतें तू कसशी नि तू पिकविशी धान्य स्वकष्टश्रमें
आतां नाङ्गरुनी समाज पिकवी राष्ट्रैक्य तू विक्रमें.

[९३]

लोकांना दुरुनी दिसे कळस तो शोभे किती सुन्दर !
  होती लुप्त परी किती दगड ते पायांमधे नाहिसे !
अन् भिन्तींतुनिही कितीक चिणले जाती पहा पत्थर,
  त्यांना आवळुनी धरी पण चुना, कोणास तो ना दिसे.
राष्ट्राची चढती कमान असतां जी व्यक्ति येअी शिरीं
  वाटे ती किति दर्शनीय शिखरावाणी जनांना गुणें !
माजे वृत्ति फुटीर जों कळस तों राहील का मन्दिरीं !
  भिन्ती तें फुगुनी चिरे निखळती. हो काय तेव्हा अुणें !
ढोलारा कलतां तयास अपुला देअूनि टेका बळें
  काही काळ तयास सावरुनिया तैसें अुभें ठेवणें
हें कर्तव्य करी, महत्त्व न कुणा त्याच्या कृतीचें कळे,
  काळें भङ्गुनि तो धुळींत पडतो की स्वीय वेडेपणें !
ती अव्यक्त जुटीर शक्ति नुरतां सारी निराशा तरी
राष्ट्रोद्धार करावयास झटती त्यांची कुणाला सरी !

[९४]

देशाच्या स्थितिचा विचार करितां मी मन्दिरासन्निध
आलों तों पडला मम श्रुतिपथीं गोङ्गाट तो तुम्बळ;
चाले गर्जुनि आरती, झणणती झान्जाही नानाविध,
त्या नादांत मनास मङ्गल मिळे अुन्माद उत्छृङ्खल.
झालों खिन्नच मी; पुढे स्थळ दिसे तोण्डास गांवाचिया
दे सर्कार जिथे स्वतः बनविली गाळीव लोकां सुरा;
गाती गर्जुनि लावणी कुणि तिथे ज्यांना सुरा ही प्रिया
जीवनन्मुक्त करी घडीभर तरी जी श्रान्त चिन्तातुरां.
हीं दोन्हीहि सुरालयें, वरिवरि भासे जरी अन्तर,
घेती विस्मृतिची समाधिच अिथे हे स्वार्थकष्टी जन,
चिन्ता जो करि आपुलीच नच हो त्या साह्य विश्वम्भर,
होती हे जन अन्धळे नि दुबळे की मानवी अिन्धन!
आत्मा हा बलहीनलभ्य नसतो साङ्गूनि गेले मुनी
अन् लाभे बळ संहतींत, परि हें ध्यानीं धरावें कुणी?

[९५]

आहे देश सुधारला किति पहा आता नव्या शिक्षणें !
घेतों सुन्दर वेष्टनांतिल किती पाश्चात्य हीं औषधें !
यन्त्रें मागवितों नृसाह्यकर हीं, हीं सोयिचीं वाहनें—
तैशीं नूतन दर्शनें बघुनि जीं झिङ्गूनि जातों मदें.
आम्ही वेष करूनि जो मिरवितों श्रीमन्त ही संस्कृती,
तो ज्यांनी विणिला तयांस धडुतें लाभो न अङ्गावरी;
पक्वान्नें पचवावयास अिकडे क्षारादिकें लागती,
शेतीं कष्टुनि धान्य जे पिकविती ते अर्धपोटी परी—
या देशांत असे असङ्ख्य खपती दैन्याचिया रौरवीं,
आम्ही त्यांजकडे कशास बघतों की क्षुद्र ते कीटक !
आम्ही तों अमुच्यामधेच रमतां सङ्गोपितों यादवी—
घेतों नेत्र सुखें मिटूनिच जरी तो काळ लावी टक.
पाही कोण कुठूनि ये हिरवळीखालून गूढ स्वर !
नाचा ! काय तळीं कढे बघुं नका, आयू असे नश्वर !

[१६]

आकाशांत फुलें, फुलेंच पवनीं, भूमीवरीही फुलें
फेका दृष्टि हवी तिथे—अुपवनीं रानीं सरींही फुलें.
हीं आहेत फुलें म्हणूनिच जगीं वाटे हवेसें जिणें,
वैराग्यक्षय लागुनी मृति बरी वाटेल यांच्याविणें.
कोणी दावुनि रङ्गरूप अपुलें चित्ता करी दुर्मद,
कोणी निःश्वसितें हवेंत पसरी माधुर्य शान्तिप्रद,
कोणी राहति अुन्च दुर्लभ पदीं, जाती अुडूनी दुजीं,
कोणाला कर लाववे न, पुसती आहेत का हीं तुझीं !
कोणाचें न फुलेल हृत्सुमन हो पाहूनि ही माधुरी,
हेलावे न सहानुभूति, न कशी जावी निराशा दुरी !
जीवाला वनवास हा पुरवला, हें फूल हासो क्षण,
माझा जीव करीन यावरुनि मी मोठ्या सुखें ओंक्षण.
या अेकीकडल्या दरींतिल गुणी न्हीरम्य साध्या फुला,
दे माझ्यास्तव सोडुनी क्षण तरी सङ्कोच हा आपुला.

[१७]

येथे मी शिकलों तसा विहरलों निश्चिन्त शस्याङ्गणीं,
वेगें जात कसे मनोरथ तदा, लागे कशी लागणी,
विद्यार्थी किति शेकडों समवयी, ते स्नेह ते मत्सर,
गेला तो मधुकाल लोटुनि तया गेले किती वत्सर !
आता ओळखिचा क्वचित् कुणि दिसे सन्मान्य अध्यापकीं
वस्तू या जड लाविती टक परी स्नेहाळ अद्याप कीं;
गेलें हाय कितीक तें बघुनिया वैषम्य वाटे मना;
आहे हें उरलें बघूनिहि परी हो गोड संवेदना.
नाना आठवणी फिरूनि पाहिल्या काढूनि होतों श्रमी,
वाटे तोंच असे अिथे अजुनिही हा बाल मी, मुक्त मी;
लोकांनी स्थळ हें जरी गजबजे अेकान्त येथे मला,
भूताची सगळी प्रभावळ मला वाटूं न दे अेकला.
ही शाळा, मम जन्मभूमि मज ही वाटे जणू माअुली
येथे सर्व समोष्णशीतल रुचे—तें अून, ही साअुली.

[१८]

आवारांत रसज्ञ लोक फिरती, कोठे मुलें खेळती;
घासाघीसच घालिती सुवसना कोठे दुकानांतुनी;
कोठे होय पुराण, शून्य हृदयें बाया तिथे बैसती;
गाभाऱ्यांत शिरूनि दर्शन तशा दाटींत घेती कुणी.
दृश्यें हीं बघुनीहि ज्यास अगदी वाटे न कौतूहल
असा अेकिकडेस तो कुणि पहा पारावरी बैसला,
वीजेचा न तिथे प्रकाश, विरळे अन्धार तो निश्चल,
हाकारी न तया कुणी, प्रभुपदीं तो रङ्गला अेकला.
लाभे गे मज हीच शान्ति तुझिया रथ्यांतही सुन्दर,
दों पक्षास अशोक गार हिरवे पाचू महामोल की !
सद्गन्धी कडुनिम्ब मोहरुनि हो, येअी कुअूचा स्वर,
—सारें ओळखिचें करें मज जरी कोणी क्वचित् ओळखी !
अन्तीं दे मज हीच शान्ति तुझिया आलिङ्गनीं निर्भर;
आहे का परि टाकिली जननि, मीं कीर्तीत तूझ्या भर ?

[११]

निद्रा सुन्दर आणि सुन्दर किती मृत्यू तिचा बान्धव !
गेला साङ्गुनि हें जगाप्रति पुरा विक्षिप्त कोणी कवी;
ज्याला श्री वश होअुनी मिळवुनी दे प्रीतिचें वैभव,
अुत्साही हृदयीं तदीय असली अुक्ती जणू वीरव वी.
कीर्तीच्या सनओंतुनी तरि निघे तोण्डांतली वाफ ना !
जीवाहूनि महाग, आणि वश हो पैक्यास ती होअुनी;
कीर्तीची मज काय चाड म्हणतां प्रीती मला साफ ना !
भिक्षेच्या पुढती तिच्या मज गमे स्वसंम्पदा हो अुणी.
अर्थात् मी परकी जनांस न लगे स्वीयांस जेव्हा नको,
धुण्डूनी परदेश केवि हृदया लाभे जिव्हाळा तिथे !
पाहूं वाट ! कशास, कोठवर ती ! आशाच देवा, नको !
होअूं काय भिकार भूत पडलीं वेचावयाला शितें !
निद्रा प्रीतिपरीच सोडुनि मला राही सुखेनैव ती;
मृत्यो, सुन्दरता तुझी तरि बघूं दे, हो सखा शेवटीं.

[१००]

तेव्हा काय अवर्णनीय मजला अस्वस्थता लाभली
प्रेमाची हृदयास होय सहसा जैं गोड संवेदना !
जाओी जीव अतीन्द्रियांत अुडुनी—तेथे कशाचा कली ?
चित्तीं शाश्वत तत्त्व तें प्रकटतां स्वर्भूमधे भेद ना.
सारी ती अनुभूति निस्तुल अशी अुन्मत्त रम्याद्भुत—
घ्यावी ती मज वाटते पुनरपी जन्मास या येअुनी—
आता स्वप्नच वाटतें जरि तदा प्यालों गमे अमृत,
सत्य सृष्टि पटे परी मज किती निस्सार वाटे अुणी !
नाही पालटलें अजूनिहि सखे माझें जुनें प्रेम तें,
नाही वाटत गे परन्तु मज तें याच्यापुढे शाश्वत;
माझें हें मन तूझिया प्रकट या रूपावरी वेधतें,
डोळ्यांना नच जाणवे, हळु असा हो त्यामधे पालट.
मातीला मिळवून टाकिल यदा दोघांस तो अन्तक
प्रेमाची पुढतीच गोष्ट, अपुली राहील का ओळख !

[१०२]

"हृत्तीरावरती पुन्हा परतती पूर्वील रम्य स्मृती.
  स्त्रीला ठार करी विवाह न कळे हें केवि, आहां कवी !
मी कैशी विसरेन ! नित्य तुमच्या पाहात आहें कृती,
  तीच प्रेमळ का पुनःपुनरपी प्रेमास जी दाखवी !"—
माझी चूक असेल ती विसर तू. या विस्मृतीच्या दिनीं
  पूर्वीचा उरलों नसेंच बघ मी रुग्णालयाच्यामधें.
तू येऊंच नकोस सन्निध अता. प्रीती यशोदायिनी
  दे वेळींच कुणास अन्य, न मला हेवा अता शारदे.
टाकूनी निज पाश गम्मत बघे तो मृत्युचा धीवर,
  ही त्याचीच दया घटिद्वय जरी राहीन मी जीवनीं.
पुष्पें हीं बनल्यास येउनि वहा आता समाधीवर,
  होतां मृत्कण हे विकीर्ण न चले गे प्रीतिसञ्जीवनी.
तीं मायाच मयासुरी पण किती गे हृद्य तीं संसृती !
भासे सत्य असार रूक्ष मज हें, ही कासया जागृती !

# टीपा

९ वें सुनीत. ठोसर=टपोर. ११ गौरी : "अष्टवर्षा भवेद् गौरी".

१४ तेराव्या सुनीतांतील गूढ व्यक्तीविषयी शैला नि तिचा भाऊ किङ्कर यांत झालेलें सम्भाषण या सुनीतांत दिलें आहे.

१५ डोळे......सावली. कैलासवासी आर्भावापाविषयींचा हा अुल्लेख आहे.

१६ शैलाचें ज्या मनुष्यावर प्रेम जडलें आहे त्याचे नायकास अुद्देशून निघालेले अुद्गार या सुनीतांत दिले आहेत. १८ भलावण=शिफारस.

२० नागफणी=सुशिक्षित लोक ज्याला डयूक्स नोझ म्हणतात तें पर्वतशिखर.

२१ चवेणी=रानकेळ. २३ या सुनीतांत खिस्ती वातावरण आणण्याचा जो प्रयत्न दिसतो त्यावरून शारदा ही खिस्ती कुटुम्बांतील असावी असें वाटतें. पहा मत्तय २।२; मत्तय ७।१४; मत्तय २७।४६.

३२ हें वर्डस्वर्थच्या "Why art thou silent ?"चें भाषान्तर आहे.

४३ जेथे वीज पडते तेथे जिवन्त झरा वाहूं लागतो असा अेक समज आहे.

४५ स्वप्न हा जीवाच्या अतृप्त वासनेचाच खेळ असतो. ४७ अुत्क्षेप=फवारा.

४८ हें स्वप्न पुढे होणाऱ्या प्रकाराचेंच पूर्वचिन्ह आहे.

५२ निखनन=(प्रेत) पुरणें. ५३ कामपूल=केम्ब्रिज.

५८ गौरीचें शिखर=गौरीशङ्कराचें खरें नांव. किङ्करानें शारदेच्या नीतिधैर्याचें अभिनन्दन करण्यास अुद्युक्त व्हावें हें त्याच्या मनाच्या मोठेपणाचेंच लक्षण आहे.

५९ पार्श्वभूमि जरी प्राचीन अैतिहासिक दिसली तरी या सुनीतांत किङ्कराला शारदेची शेवटली भेट घ्यावयाची कशी फोल अुत्कण्ठा आहे हेंच साङ्गितलें आहे.

६० शारदेच्या विवाहानन्तर कोठे तरी सार्वजनिक ठिकाणीं तिची नि किङ्कराची गांठ पडते, त्या गांठीचा वृत्तांत या सुनीतांत आहे.

६३ किङ्कराला अेका प्रदर्शनाला घेअून जाणाऱ्या मनुष्याचे हे उद्गार आहेत.

६५ ही लौकरच ओढवणाऱ्या मृत्यूची सूचना आहे.

६८ किङ्कर हाच माझ्यामागे लोचटपणाने लागला होता, माझें त्याच्यावर प्रेम कधीच नव्हतें असे काहीतरी स्वसमर्थनाचे उद्गार विवाहोत्तर शारदेने काढले असले पाहिजेत; आणि त्यांचा विपरीत समाजिक परिणाम किङ्कराला भोगावा लागला आहे. जणू काय अेखाद्या बालेवर अेखाद्या अविवाहित तरुणाने प्रेम करावें यासारखें दुसरें पातकच नाही! दुर्दैवें...सुळीं. पुढील अवतरण पहावें. "तेव्हा येशू म्हणाला, हे बापा ह्यांची क्षमा कर; कारण ते काय करितात हें त्यांस समजत नाही." लूक २३।३३.

६९ वैयक्तिक जीवन निस्सार झाल्यामुळेच किङ्कर आता जगांतील विविध व्यक्तींकडे नि घटनांकडे पाहूं लागतो. ६९ वें सुनीत कै. नारायण वामन टिळकांवर आहे.

REFBK-0005783

REFBK-0005783

७१ हें बायरन्च्या Eternal Spirit of the Chainless Mind या सुनीताचें भाषान्तर वा रूपान्तर आहे.

७३ भिकार किङ्कराला आता श्रीकान्त–शारदा यांनी कसें ओळखावें ?

७७ ह्या सुनीतांत जपानांतील प्रचण्ड भूकम्प, रशियांतील राज्यक्रान्ति, तुर्कस्थानांतून ग्रीकांसह खलिपांचीहि हकालपट्टी अित्यादि अैतिहासिक घटनांचे अुल्लेख आहेत.

७८ आज अमुक शें लग्नें लागलीं अशी फुशारकीची वार्ता पुण्यांत अैकायाला मिळते.

८२ पेठा म्हणजे आग्र्याला होणारा विशिष्ट रीतीचा कोहाळेपाक.

८३ सम्भाजी महाराजांचा वध गुढीपाडव्याच्या आधल्या दिवशीं करण्यांत आला.

८६ भाग्यनगर हें हैदराबादेचें जुनें नांव; भागानगरहि म्हणत असत.

८८ हे विद्यासेवक कै. डॉ. श्रीधर व्यङ्कटेश केतकर होत. ८९ 'रास' हबशी सुभेदार.

९० तीस वर्षांपूर्वी जपानविषयी जें वाटत होतें तें आता वाटतें काय ?

९१ या सुनीतावर वर्ड्स्वर्थच्या O Friend, I know not which way I should look या सुनीताची दाट छाया आहे.

९९ हा विक्षिप्त कवि शेली होय. क्वीन मॅब्चा आरम्भ पहावा.

१०१ प्रस्तुत कवीच्या विरहतरङ्गाच्या शेवटींहि असाच नायक-नायिकांच्या भेटीचा प्रसङ्ग आहे.

———